अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १३६ । शुक्रवार २७ फेब्रुवारी २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com

## कोणालाही वाऱ्यावर सोडणार नाही : सुनेत्रा पवार



मुंबई : राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर सुनेत्रा पवार यांनी पक्षाच्या सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना उद्देशून भाषण केलं. आजचा प्रसंग माझ्यासाठी वेदना आहे, हा क्षण माझ्यासाठी लाखो कार्यकर्त्यांची जबाबदारी स्वीकारणारा आहे. मी पक्षाचा विचार पुढे घेऊन जाण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करेल. आपल्या सर्वांचे लाडके नेते अजित दादा यांच्या अकाली जाण्याच्या अपार दुःखातून आपण अजूनही सावरलो नाहीत. त्यांच्या जाण्याने मोठी पोकळी झाली असून ती भरून निघण्यासारख नाही, असे म्हणत सुनेत्रा पवार यांनी राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून पहिलंच भाषण केलं. यावेळी, त्यांचा कंठ दाटला होता. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष हा माझा परिवार असून समाजातील कोणत्याही घटकाला मी वाऱ्यावर सोडणार नाही, असे म्हणत सुनेत्रा पवार यांनी सर्व समाजाला सोबत घेऊन आपण पुढे जाणार असल्याचे स्पष्ट केले.

# भ्रमातून बाहेर पडा, विकासात योगदान द्या

### मुख्यमंत्री फडणवीसांचा विरोधकांवर हल्लाबोल; अर्थव्यवस्था, शिक्षण आणि गुंतवणुकीवर स्पष्ट भूमिका

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** राज्य विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांच्या आरोपांना जोरदार प्रत्युत्तर देत राज्याच्या विकासावर प्रकाश टाकला. राज्यपालांच्या अभिभाषणावर झालेल्या चर्चेत फडणवीसांनी विरोधी पक्षांना 'भ्रमित आणि संभ्रमित' म्हणत सडेतोड उत्तर दिले. भ्रमात राहून धावण्यापेक्षा संभ्रमातून बाहेर पडा आणि शांतपणे मुद्दे मांडा, असा सल्ला देत त्यांनी आर्थिक विकासाच्या दृष्टीने गतिशील महाराष्ट्राच्या हितासाठी विरोधकांचे योगदान वाढावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

फडणवीसांनी मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण अभियानावर बोलताना आमदार भास्कर जाधव यांच्या आरोपांचा समाचार घेतला. हे अभियान ११ महिन्यांचे आहे आणि युवकांना अनुभवपत्र देण्यात येत आहे. पर्मनंट नोकरीचे आश्वासन दिल्याचे रेकॉर्ड असेल तर पाठवा, असे आव्हान देत जाधवांचे मत खोडून काढले. विरोधकांना टोला लगावत ते म्हणाले, चांगल्याला चांगले म्हणायला शिका. विरोधकांनी चहापानपासून राजकारण सुरू केले. आम्ही तुम्हाला काळा चहा नव्हे, गोकुळ दुधाचा चहा पाजला असता. शिक्षण धोरणावर बोलताना फडणवीसांनी स्पष्ट केले की, महाराष्ट्रात मराठी अनिवार्य आहे. ८४ टक्के



शाळा मराठी माध्यमांच्या आहेत आणि ६९ टक्के विद्यार्थी मराठी शिकत आहेत. मराठी शाळा बंद पडल्याची माहिती कपोलकल्पित आहे.

हिंदी भाषेच्या सक्तीवर बोलताना त्यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंच्या काळातील समितीचा उल्लेख करत विरोधकांना कोंडीत पकडले. २१ सप्टेंबर २०२० साली उद्धव ठाकरेंनी नेमलेल्या समितीने ही शिफारस केली आणि मंत्रिमंडळाने स्वीकारली. फडणवीसांनी महाराष्ट्राला स्टार्टअप हब म्हणून सादर केले. देशातील २० टक्के स्टार्टअप महाराष्ट्रात आहेत. (पान ४ वर)

### देवाभाऊंमुळे दोन भाऊ एकत्र

**फडणवीसांनी उद्धव ठाकरेंच्या काळातील शिक्षण समितीचा उल्लेख करत म्हटले, उद्धव ठाकरेंनी नेमलेल्या समितीने हिंदी-इंग्रजी सक्तीची शिफारस केली आणि मंत्रिमंडळाने स्वीकारली. राज ठाकरेंना टोला लगावत ते म्हणाले, विरोधकांची स्थिती करून करून भागले आणि देवपूजेला लागले. तुमच्यासोबत राजसाहेब पण नादी लागले. तसेच, दोन भाऊ एकत्र आल्याचे श्रेय देवेंद्र फडणवीसला आहे, असे रेकॉर्डवर आणले.**

### ५ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था

**फडणवीस म्हणाले, २०४७ पर्यंत ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था तयार करायची. दरवर्षी १० लाख रोजगार निर्माण करू. वित्तीय तूट २.५ टक्क्यांखाली आणू. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ५१ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचली असून, २०१२-१३ मधील १३ लाख कोटींवरून तिप्पट झाली. ६६० बिलियन डॉलरपर्यंत पोहोचलो. इतर राज्यांपासून दूर आहोत. पुढील ४-५ वर्षांत ट्रिलियन डॉलर होऊ.**

# जिल्हा परिषद अन् पंचायत समितीमध्येही स्वीकृत सदस्य

### कॅबिनेट बैठकीत शिक्कामोर्तब : जिल्हा परिषदेत सदस्य संख्येच्या १०% तर पंचायत समितीत २०% स्वीकृत सदस्य

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** राज्यातील महापालिका आणि नगरपालिका निवडणुकांचा निकाल लागल्यानंतर तेथे स्वीकृत नगरसेवकांची निवड करण्यात आली आहे. संख्याबळाच्या आधारावर पक्षांना हे स्वीकृत नगरसेवकपद मिळाले आहेत. त्यातच, नुकतेच जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकाही पार पडल्या असून आता जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमध्येही स्वीकृत सदस्य असणार आहेत. राज्य मंत्रिमंडळात या निर्णयावर शिक्कामोर्तब झाले. जिल्हा परिषदेत सदस्य संख्येच्या १० टक्के तर पंचायत समितीत सदस्य संख्येमागे २० टक्के सदस्य निवडता येणार असल्याची माहिती आहे.

किमान ५ सदस्य निवडणे बंधनकारक असणार आहे. यासंदर्भात लवकरच विधिमंडळात कायदा पारीत केला जाणार असल्याची माहिती आहे.

### निवडणूक लढविण्याची क्षमता नसलेल्यांना संधी

**ग्रामीण भागात समाजाभिमुख कार्य करणाऱ्या, परंतु निवडणूक लढविण्याची क्षमता नसलेल्या पात्र कार्यकर्त्यांना विकास प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी उपलब्ध होईल,या उद्देशाने महायुती सरकारने हा निर्णय घेतला आहे. त्यामुळे, आता इच्छुक कार्यकर्त्यांना जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सभागृहात बसण्याची संधी मिळणार असल्याचे निश्चित झालं आहे.**

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्वीकृत सदस्यसंदर्भात मुख्यमंत्र्यांकडे (पान ४ वर)

# रोहित पवारांची सीआयडीकडे धाव

### अजितदादा अपघात : विमान कंपनीवर एफआयआर नोंदविण्यासाठी प्रयत्न

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**पुणे :** राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी सीआयडी कार्यालयात भेट देऊन विमान अपघात प्रकरणी एफआयआर नोंदविण्याची मागणी केली. या अपघातात अजित पवारांचा मृत्यू झाल्याच्या पार्श्वभूमीवर त्यांनी डीजीसीएच्या अहवालाचा हवाला देत कंपनीला जबाबदार धरले. मात्र, एफआयआर नोंदविण्यात अडथळे येत असल्याचे त्यांनी सांगितले.

रोहित पवार म्हणाले, डीजीसीएने 'व्हीएसआर' कंपनीला अपघातासाठी दोषी ठरवले आहे. २४ फेब्रुवारीला हा अहवाल समोर आल्यानंतर मी मुंबईत गुन्हा दाखल करण्याची विनंती केली, पण एफआयआर घेतला गेला नाही. ते पुढे म्हणाले, बारामती आणि मुंबईत तीन-तीन तास बसून राहिलो, तरीही एफआयआर नोंदवला गेला नाही. (पान ४ वर)

## महत्त्वाचे..

### अधिकृत आधार केंद्र आता गुगल मॅपवर!

नवी दिल्ली : अधिकृत आधार केंद्रांच माहिती आता गुगल मॅपवर पाहायला मिळणार आहे. आता जवळच्या आधार केंद्राचा पत्ता आणि उपलब्ध सेवा गुगल मॅपवर सापडतील. अधिकृत सुमारे ६० हजार आधार केंद्रे गुगल मॅप्सवर प्रदर्शित करण्यासाठी युनिक आयडेंटिफिकेशन अथॉरिटी ऑफ इंडिया आणि गुगलने भागीदारी केली आहे. गुगल आणि यूआयडीएआयमधील सहकार्याच्या पुढील टप्प्यात यूआयडीएआय केंद्राची माहिती व्यवस्थापित करण्यासाठी आणि लोकांच्या अभिप्रायाला थेट प्रतिसाद देण्यासाठी गुगल व्यवसाय प्रोफाइलचा वापर करेल. भविष्यात, भागिदारी गुग नकाशे इंटरफेसद्वारे थेट अपॉइंटमेंट बुकिंग करता येईल. आधार केंद्रांकडून ज्या प्रकारच्या सेवा दिल्या जातात, त्यानुसार आधार केंद्रांची माहिती गुगल मॅपवर दिसेल. लहान मुलांची नोंदणी, प्रौढ नागरिकांची नोंदणी, फक्त पत्ता अपडेट करणं, मोबाईल क्रमांक अपडेट करणं यानुसार माहिती गुगल मॅपवर दिसेल. दिव्यांगांच्या सोयींची उपलब्धता, इन्फ्रास्ट्रक्चर, पार्किंग सुविधा, कामाचे तास याबाबतची माहिती गॅगल मॅपवर उपलब्ध असेल. याबाबतच्या सुविधा येत्या काही दिवसात गुगल मॅपवर दिसतील.

## प्रवरा कालवा अतिक्रमणधारकांना हद्द आखून देणार

### न्यायालयाच्या निर्णयाने कारवाई स्थगित : अतिक्रमणधारकांनी उपोषण घेतले मागे



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर शहरातील प्रवरा कालवा परिसरात राहणाऱ्या नागरिकांना जलसंपदा विभागाने अतिक्रमणात असलेली घरे काढून घेण्याची नोटीस दिली. तो निर्णय मागे घ्यावा म्हणून सुरू असलेले उपोषण मागे घेण्यात आले. न्यायालयाच्या निर्णयामुळे एक महिना कारवाई करणार नसून त्याच्या आत आपण जागा मोकळी करावी किंवा न्यायालयात जाऊन दाद मागावी, असे सांगितले. अतिक्रमणधारकांच्या मागणीनुसार त्यांना सोमवारपासून अतिक्रमणाची हद्द आखून देणार असल्याचे आश्वासन पाटबंधारे विभागाच्या वतीने देण्यात आले.

प्रवरा कालव्या शेजारी राहणाऱ्या नागरिकांना शासनाने कोणत्याही प्रकारचा मानवतावादी उपाय न करता अचानकपणे बेदखल करण्याचा आदेश देणे हे अन्यायकारक व अमानवी आहे. सदरचा निर्णय तात्काळ स्थगित करून संबंधित नागरिकांना देण्यात यावा. यासाठी महात्मा गांधी पुतळ्याजवळ या नागरिकांनी तसेच बहुजन समाज पार्टीने उपोषण सुरू केले होते. उपोषण मागे घ्यावे म्हणून प्रशासनाकडून उपोषण मागे घ्यावे म्हणून काल जलसंपदाचे अधिकारी कल्हापूरे, शेख व पोलिस निरीक्षक नितीन देशमुख यांनी भेट देऊन सांगितले. त्यावेळी न्यायालयाच्या निर्णयामुळे एक महिना कारवाई करणार नसून त्याच्या आत आपण जागा मोकळी करावी किंवा न्यायालयात जाऊन दाद मागावी, असे सांगितले.

त्यावर उपोषणकर्त्यांनी अतिक्रमणाची हद्द आखून द्या अशी मागणी केली त्यानुसार सोमवारपासून अतिक्रमणाची हद्द आखून देणार असल्याचे आश्वासन जलसंपदाचे अधिकारी कल्हापूरे व शेख यांनी दिले. त्यामुळे अतिक्रमणधारकांनी आंदोलन मागे घेतले.

## देवळालीतील दूध भेसळखोरीचा एलसीबीकडून पर्दाफाश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री




**राहुरी :** अहिल्यानगर जिल्ह्यात सर्वसामान्यांच्या आरोग्याशी खेळ करणारे बनावट दूध रॅकेट उघडकीस आले आहे. पॅराफिन आणि रासायनिक द्रव्यांच्या मिश्रणातून घातक क्रिम तयार करून त्यापासून तब्बल २० पट दूध तयार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणात ३१ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर देवळाली प्रवरा येथील एका गोडाऊनमध्ये घातक क्रीम बनविली जात असल्याची माहिती समोर आल्याने राहुरी तालुक्यात खळबळ उडाली आहे.


**एक लिटर क्रीम पासून २० लिटर दुध निर्मिती**

अहिल्यानगर जिल्ह्यातील दूध व्यवसायाला काळीमा फासणारा मोठा प्रकार स्थानिक गुन्हे शाखेने उघड केला आहे. जामखेड तालुक्यातील फक्राबाद येथे १४ फेब्रुवारी रोजी एलसीबी आणि अन्न व औषध प्रशासनाने संयुक्त कारवाई करत बनावट दूध निर्मितीचा पर्दाफाश केला.

तपासात उघड झाले की, पॅराफिन म्हणजेच मिनरल ऑइल, '९.५' नावाचे रासायनिक द्रव्य, मिल्क क्रिम आणि पाणी यांचे मशीनद्वारे मिश्रण करून घातक क्रिम तयार केली जात होती. या एका लिटर क्रिमपासून तब्बल २० लिटरपर्यंत बनावट दूध तयार केले जात होते. राहुरी तालुक्यातील देवळाली प्रवरा परिसरातील गोडाऊनमध्ये ही क्रिम तयार केली जात होती. ही क्रिम राहुरी, श्रीरामपूर, नेवासा, जामखेड, श्रीगोंदा तसेच बीड जिल्ह्यात पुरवली जात होती.

दरम्यान, देवळाली प्रवरा येथील ज्या गोडाऊनमध्ये हा उद्योग सुरू होता त्या ठिकाणी धाड टाकली असता मशीन गायब असल्याचे आढळले.

संबंधितांच्या नातेवाईकांनी मशीन हलविल्याचा संशय व्यक्त होत आहे. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबीचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी, पोलीस उपनिरीक्षक समीर अभंग या प्रकरणाचा तपास करत आहे.



## संपादकीय

# अजितदादांच्या विमान अपघाताची पारदर्शक चौकशी हवीच!

महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर अजित पवार हे नाव कायमच एका कर्तबगार नेत्याचे प्रतीक राहिले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते, राज्याचे माजी उपमुख्यमंत्री आणि विकासाच्या अनेक योजना राबवणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख आहे. मात्र, त्यांच्या अपघाती निधनाने संपूर्ण राज्य हादरले. विमान अपघाताच्या या प्रकरणात सुरुवातीला सामान्य दुर्घटना म्हणून पाहिले गेले तरी, आता यात संशयाचे ढग गडद होत चालले आहेत. प्रकरण आता पुण्याच्या राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे (सीआयडी) वर्ग करण्यात आले असले, तरी तपासाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहेत. रोहित पवार यांसारख्या तरुण नेत्याने उपस्थित केलेले मुद्दे दुर्लक्ष करण्यासारखे नाहीत. या संपादकीयात या घटनाक्रमाचा सुरुवातीपासून मागोवा घेत, संशयास्पद बाबींकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न आहे. प्रशासन, शासन आणि तपास यंत्रणांनी याकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे, अन्यथा न्यायव्यवस्थेवरील विश्वास उडेल.

अजित पवार यांचा विमान अपघात घडला तेव्हापासून आजपर्यंतचा प्रवास पाहता, अनेक टप्पे संशयास्पद वाटतात. अपघात घडल्यानंतर लगेचच राज्यातील काही नेत्यांनी यात घातपाताचा संशय व्यक्त केला. मात्र, तेव्हा शासन आणि तपास यंत्रणांनी याकडे फारसे लक्ष दिले नाही. सामान्य नागरिकांनाही ही केवळ दुर्घटना वाटली. पण पवार कुटुंबातील तरुण नेते आमदार रोहित पवार यांनी या प्रकरणाला नवे वळण दिले. गेल्या काही दिवसांत त्यांनी विमान अपघाताबाबत सातत्याने प्रश्न उपस्थित केले. पुणे, मुंबई आणि नवी दिल्ली येथे पत्रकार परिषदा घेतल्या, व्हिडिओ प्रेझेंटेशनद्वारे तथ्ये मांडली आणि तपास यंत्रणांना पुरावे सादर केले. ते केवळ संशय व्यक्त करत नाहीत, तर 'हा घातपात आहे' असा विश्वास व्यक्त करत आहेत. इतकेच नव्हे, आंतरराष्ट्रीय तपास यंत्रणांना सोबत घेण्याचे आवाहनही त्यांनी शासनाला केले आहे.या दरम्यान, प्रकरण सीआयडीकडे वर्ग झाले. गुरुवारी सीआयडीचे अप्पर पोलीस महासंचालक सुनील रामानंद यांनी पत्रकार परिषद घेतली आणि काही खुलासे केले. मात्र, रोहित पवार यांनी यावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली. त्यांनी सीआयडीच्या कार्यालयात जाऊन अधिकाऱ्यांची भेट घेतली आणि माध्यमांसमोर अनेक मुद्दे मांडले. ''सीआयडी तपास करत आहे म्हणून एफआयआर घेता येत नाही असे नाही. आमचा एफआयआर घेतला नाही, त्यामुळे शंका वाढते,'' असे ते म्हणाले. २७ दिवसांनंतर घेण्यात आलेल्या या परिषदेत सीआयडीने फक्त 'तपास योग्य दिशेने चालू आहे' इतकेच सांगितले. डीजीसीएच्या अहवालाबाबत कोणतीही माहिती दिली नाही. विमान खराब होते हे डीजीसीएने स्वीकारले तरी, सीआयडीकडे त्याची माहिती नाही, हे आश्चर्यकारक आहे.

या प्रकरणातील अनेक बाबी संशयास्पद आहेत, ज्या तपास यंत्रणांनी गांभीर्याने तपासल्या पाहिजेत. प्रथम, विमान अपघाताची कारणे. डीजीसीएने विमान खराब असल्याचे मान्य केले, तरी सीआयडीला त्याची माहिती नाही? यात काही दबाव आहे का? दुसरे, रोहित पवार यांनी थेट आरोप केले आहेत की, ''डीजीसीए आणि व्हीएसआर कंपनीला कोणतरी वाचवत आहे.'' ते पुढे म्हणतात, ''तेलुगू देसम पार्टीचे (टीडीपी) खासदार राममोहन नायडू हे हवाई उड्डाण मंत्री आहेत. चंद्राबाबू नायडू यांनीच त्यांना मंत्री बनवले. त्यांच्या जवळच्या लोकांची एक नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनी (एनबीएफसी) आहे, ज्याने व्हीएसआरला फंडिंग केले. इतकेच नव्हे, चंद्राबाबू नायडू स्वतः व्हीएसआरचे मालक रोहित सिंग यांच्या लग्नाला हजर होते.'' हे आरोप गंभीर आहेत. यात राजकीय दबाव आणि आर्थिक हितसंबंध दडलेले आहेत का? डीजीसीए आणि एएआयबी (एअरक्राफ्ट ॲक्सिडेंट इन्व्हेस्टिगेशन ब्यूरो) यांचा तपास पारदर्शक राहणार नाही, असा दावा रोहित पवार करतात.तिसरे, एफआयआर नोंदवण्यात होत असलेला विलंब. रोहित पवार यांनी पुरावे सादर केले, स्टेटमेंट दिले, तरी एफआयआर घेतला जात नाही. यामुळे घातपाताची शंका अधिक बळकट होते. चौथे, प्रारंभीच्या संशयाकडे दुर्लक्ष. इतर नेत्यांनी व्यक्त केलेला संशय का गांभीर्याने घेतला नाही? आणि पाचवे, पवार कुटुंबाची भूमिका. रोहित पवार यांच्या प्रयत्नांना आता कुटुंबातील इतर सदस्य समर्थन देत आहेत. हे दर्शवते की, ही केवळ राजकीय स्टंट नाही, तर न्यायाची मागणी आहे.

महाराष्ट्रात पवार कुटुंबाला राजकारण, समाजकारण, उद्योग आणि एकूणच सामाजिक व्यवस्थेत विशेष स्थान आहे. शरद पवार यांच्यापासून अजित पवारांपर्यंत, त्यांच्या योगदानाशिवाय राज्याच्या विकासाची कल्पना करणे कठीण आहे. अशा कुटुंबातील सदस्याचा अपघात आणि त्याच्या चौकशीत होत असलेला संघर्ष अनाकलनीय आहे. हे केवळ पवार कुटुंबाचे नुकसान नाही, तर लोकशाही आणि न्यायव्यवस्थेच्या विश्वासाचे नुकसान आहे.शासन, प्रशासन आणि तपास यंत्रणांनी याकडे तातडीने लक्ष द्यावे. एफआयआर नोंदवा, पारदर्शक तपास करा आणि राजकीय दबाव असल्यास त्याची चौकशी करा. आंतरराष्ट्रीय यंत्रणांना सोबत घ्या, जेणेकरून सत्य समोर येईल. अन्यथा, हे प्रकरण महाराष्ट्राच्या राजकारणात एक काळा अध्याय ठरेल. न्याय मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागणे हे लोकशाहीचे अपयश आहे.

# कुत्र्यांनी लचके तोडलेल्या बेवारस गाईंच्या बछड्यांना सागर तनपुरेंनी दिला आश्रय

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** शहरातील भांगडा डोंगर परिसर व मल्हारवाडी रोडवरील कृष्ण मंदिर शिवारात बेवारस गायींची लहान वासरे टाकून दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या निष्पाप वासरांवर भटक्या कुत्र्यांनी हल्ले करून चार ते पाच वासरांचे लचके तोडल्याची माहिती मिळताच शहरात संतापाची तीव्र लाट उसळली आहे. मानवतेला काळिमा फासणाऱ्या या घटनेमुळे नागरिकांमध्ये तीव्र भावना व्यक्त होत आहेत.

**समाजसेवेचे ढोंग घेणाऱ्यांना सागर तनपुरे यांचा सवाल**

काही तथाकथित समाजसेवकांवर गंभीर आरोप करत सागर तनपुरे म्हणाले, जनावरांना कत्तलीसाठी नेणारी वाहने अडवून मारहाण करणे, हप्ते वसूल करणे ही गोसेवा नव्हे, हा अवैध धंदा आहे. खरी गोसेवा म्हणजे अशा जखमी, बेवारस जनावरांना आधार देणे. देशात वाढत्या कर्करोग रुग्ण संख्येच्या पार्श्वभूमीवर आणि गोमांस निर्यातीबाबत होत असलेल्या चर्चांचा उल्लेख करत त्यांनी खरी गोसेवा नेमकी कोण करत आहे ? असा ज्वलंत प्रश्न नगरसेवक सागर तनपूरे यांनी उपस्थित केला.

घटनेची माहिती मिळताच नगरसेवक सागर तनपुरे यांच्या पुढाकाराने गोसेवक तरुणांनी दि. २५ फेब्रुवारी २०२६ रोजी घटनास्थळी धाव घेतली. जखमी वासरांना तातडीने शहरातील केशररंग मंगल कार्यालयात हलवून त्यांच्यावर उपचार करुन संगोपनाची व्यवस्था करण्यात आली. पशु वैद्यकीय उपचारांसह त्यांना सुरक्षित आश्रय देण्यात आला. गोसेवेच्या नावाखाली केवळ दिखावा करून चालणार नाही, प्रत्यक्ष कृती हवी. मुक्या प्राण्यांच्या डोळ्यातील वेदना पाहिल्या नंतर स्वस्थ बसणे अशक्य आहे, अशा शब्दांत सागर तनपुरे यांनी संताप व्यक्त केला.

या बचाव मोहिमेत दिपक रकटे, गणेश पवार, बाळा रोकडे, एकनाथ बर्डे, योगेश वाघ, अशोक हारदे, नितिन वराळे, राहुल डौले, विजय उंडे, शुभम वराळे, वरुण गुलदगड आदी कार्यकर्त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.



# एकल महिला रोजगार मार्गदर्शन मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** एकल महिलांना विविध उद्योग व्यवसायाच्या माध्यमातून रोजगार निर्मितीसाठी पंचायत समिती सभागृहात रोजगार मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते.या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अध्यक्षस्थानी तहसीलदार डॉ. संजय बिरादार हे होते याप्रसंगी नेवासा तालुक्यातील बचत गटाच्या २५० हून अधिक एकल महिला रोजगार मार्गदर्शन शिबिरात सहभागी झाल्या होत्या .

उमेद अभियान, महिला व बाल विकास प्रकल्प व साऊ एकल महिला नेवासा तालुका समिती यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २५ रोजी रोजगार मार्गदर्शन शिबिर संपन्न झाले. या शिबिरास गटविकास अधिकारी संजय लखवाल नायब तहसीलदार संदीप चिंतामणी, नगराध्यक्ष डॉ. करणशिंह घुले, साऊ एकल महिला समितीचे श्रीरामपूर तालुका समन्वयक मिलिंदकुमार साळवे, नेवासा तालुका समन्वयक कारभारी गरड , अप्पासाहेब वाबळे , रेणुका चौधरी , सेंट्रल बँक समन्वयक रविंद्र काळे , जिल्हा संसाधन कृषी अधिकारी सीमा काळकुंड , बाल विकास प्रकल्पाधिकरी भावना



पवार ,रेणुका कुऱ्हे , उमेद अभियान तालुका व्यवस्थापक अर्जुन सोनवणे , ऐश्वर्या देशमुख ,विलास राठोड आदींची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी गट विकास अधिकारी संजय लखवाल तहसीलदार संजय बिरादार ,रविंद्र काळे ,सिमा काळपुंड , मिलिंद साळवे, कारभारी गरड , अर्जुन सोनवणे आदींनी आपल्या मनोगतातून एकल महिला बचत गटासाठी व वैयक्तिक शासनाच्या विविध योजना , करावयाचे उद्योग - व्यवसाय त्यासाठी आवश्यक कागदपत्र सादर करावयाचा प्रस्ताव,कर्ज मर्यादा ,अनुदान ,बँकेची मंजुरी , परतफेड, तयार केलेले साहित्य वस्तू यांची विक्री व्यवस्थापन याबाबत सविस्तर विवेचन केले. सूत्रसंचालक बाळासाहेब पिसाळ यांनी केले, शिबिर यशस्वीतेसाठी सहाय्यक गट विकास अधिकारी बाळासाहेब कासार , जयश्री जाधव,नितीन पंडित, तालुक्यातील अंगणवाडी पर्यवेक्षिका, बचत गटाच्या सीआरपी व अंगणवाडी ताई यांनी विशेष परिश्रम घेतले.

# प्रवरा औषधनिर्माणशास्त्रच्या ४० विद्यार्थ्यांची बहुराष्ट्रीय कंपनीत निवड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण संस्था संचलित प्रवरा ग्रामीण औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय येथील डी फार्मसी पदविका,बी आणि एम फार्मसी आणि पदवी अभ्यासक्रमातील एकूण ४० विद्यार्थ्यांची मॅकलिओड्स फार्मास्युटिकल्स या बहुराष्ट्रीय औषधनिर्मिती कंपनीमध्ये कॅम्पस मुलाखतीद्वरे निवड झाली आहे, अशी माहिती महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. के. मंगाथायारू यांनी दिली.

महाविद्यालयात आयोजित कॅम्पस भरती प्रक्रियेत डी. फार्मसी अभ्यासक्रमातील ९ तसेच बी. फार्मसी आणि एम. फार्मसी अभ्यासक्रमातील ३१ विद्यार्थ्यांची विविध विभागांसाठी निवड करण्यात आली. या निवड प्रक्रियेसाठी महाविद्यालयातील सुमारे दोनशे विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता.या कॅम्पस भरतीसाठी महाविद्यालयाच्या ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट विभागाचे प्रमुख प्रा. अमोल दिघे यांनी विशेष परिश्रम घेतले.



# संजीवनी युवा प्रतिष्ठान 'शिवऊर्जा यात्रा' किल्ले रायगडावर जाणार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** छत्रपतींच्या पराक्रमाची आणि स्वराज्याच्या तेजस्वी इतिहासाची साक्ष देणाऱ्या किल्ले रायगड येथे संजीवनी युवा प्रतिष्ठानतर्फे 'शिवऊर्जा यात्रा' आयोजित करण्यात आली आहे. दिनांक २८ फेब्रुवारी रोजी कोपरगाव येथून युवकांचे प्रस्थान होणार असून या यात्रेद्वरे इतिहासाची सखोल माहिती जाणून घेणे तसेच किल्ले स्वच्छता अभियान राबविणे हा मुख्य उद्देश आहे.या मोहिमेसाठी मोठा प्रतिसाद युवकांकडून मिळतो आहे. निवास,भोजन व प्रवास वाहन व्यवस्था प्रतिष्ठानकडून करण्यात आली आहे.

छत्रपती छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाची भूमी असलेल्या रायगड किल्ल्याला विशेष महत्वाचे स्थान प्रत्यकाच्या मनात आहे. स्वराज्याच्या राजधानीचा मान मिळालेल्या या गडावर युवकांना प्रत्यक्ष भेट देत इतिहासाचा अभ्यास करता यावा, त्यांच्या मनात राष्ट्राभिमान व सामाजिक बांधिलकीची भावना दृढ व्हावी, यासाठी युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांच्या संकल्पनेतून ही यात्रा आयोजित करण्यात आली आहे.

दरवर्षी शिवजयंतीचे औचित्य साधून युवकांना गडकिल्ल्यांवर घेऊन जाण्याची संकल्पना युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांची आहे. गतवर्षी किल्ले शिवनेरी येथे अशीच यशस्वी मोहीम राबविण्यात आली होती. त्या उपक्रमाला युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला होता. यावर्षी रायगडासारख्या ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वपूर्ण किल्ल्याची निवड करून शिवकार्याची प्रेरणा अधिक व्यापक करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

या यात्रेदरम्यान इतिहास अभ्यासकांकडून मार्गदर्शन, स्वराज्यकालीन वास्तूंची माहिती, तसेच परिसर स्वच्छता अभियान राबवून 'स्वच्छ गड सुरक्षित वारसा' हा संदेश दिला जाणार आहे. युवकांनी मोठ्या संख्येने प्रतिसाद दिला असून इतिहासातून ऊर्जा घेण्याचे कार्य केले जाणार आहे.

# रामकृष्ण आश्रमात धर्म ध्वजारोहणाने गाथा पारायण सोहळ्यास प्रारंभ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील गोणेगाव चौफुला येथील श्री विठ्ठल रुख्मिणी अध्यात्मिक केंद्र संचलित रामकृष्ण आश्रमामध्ये आश्रमाचे प्रमुख महंत व हरि भक्त परायण भगवान महाराज जंगले शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली गाथा पारायण सोहळ्यास गुरुवार दि.२६ फेब्रुवारी पासून धर्म ध्वजारोहणाने वातावरणात प्रारंभ झाला.

गाथा पारायण शुभारंभ प्रसंगी ग्रंथ पूजन व विना पूजन आश्रमाचे प्रमुख ह भ प भगवान महाराज जंगले शास्त्री,निलेश महाराज रोडे,शिवाजी महाराज जाधव,नामदेव कंक,दादासाहेब दिघे,मच्छिंद्र जंगले,बाळासाहेब कार्ले,सरपंच रावसाहेब दिघे,गारोळे साहेब,विणेकरी यमाजी जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी हनुमान भक्त ज्योतिष शास्त्र तज्ञ बाळकृष्ण महाराज कुलकर्णी यांनी झालेल्या धार्मिक कार्यक्रमाचे पौरोहित्य केले यावेळी पंचक्रोशीतील भाविक,रामकृष्ण आश्रमातील विद्यार्थी उपस्थित होते

गाथा पारायण विविध कार्यक्रम होणार असून, अनेक कीर्तने होणार आहेत. दि . ५ मार्च रोजी रामकृष्ण आश्रमाचे प्रमुख महंत वेदमूर्ती हभप भगवान महाराज जंगले शास्त्री यांच्या सकाळी १० ते १२ यावेळेत होणाऱ्या काल्याच्या किर्तनाने गाथा पारायण सांगता होणार आहे.



# खोडद येथील जीएमआरटी केंद्रात भव्य विज्ञान प्रदर्शन

## दोन दिवसांत २३० हून अधिक प्रकल्प पाहण्याची संधी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नारायणगाव :** राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त, जुन्नर तालुक्यातील खोडद येथील प्रसिद्ध जीएमआरटी केंद्रमध्ये शनिवार (ता. २८ फेब्रुवारी) आणि रविवार (ता. १ मार्च) या दोन दिवसांमध्ये भव्य विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

टाटा मूलभूत संशोधन संस्थेच्या वतीने गेल्या २४ वर्षांपासून राबवला जाणारा हा उपक्रम सकाळी ९:३० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत विद्यार्थी आणि सर्वसामान्यांसाठी विनामूल्य खुला असेल. या प्रदर्शनाद्वरे खगोलशास्त्र, भौतिकशास्त्र आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील आधुनिक प्रगती जवळून पाहण्याची संधी मिळणार आहे.

प्रदर्शनाचे उद्घाटन २८ फेब्रुवारी रोजी सकाळी ९:३० वाजता राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्राचे संचालक डॉ. कौशिक बॅनर्जी यांच्या हस्ते होईल. कार्यक्रमाचा समारोप १ मार्च रोजी दुपारी ३:३० वाजता कृषी महाविद्यालय पुणे येथील सह-अधिष्ठाता डॉ. महानंद माने यांच्या उपस्थितीत होईल.

प्रदर्शनात पुणे जिल्ह्यातील शाळा आणि अभियांत्रिकी महाविद्यालयांचे २३० हून अधिक वैज्ञानिक प्रकल्प मांडले जातील, तसेच विविध नामवंत संस्थांचा सहभागही असेल. खोडद येथील रेडिओ दुर्बीण जगातील एक विशिष्ट प्रकारची सर्वात मोठी दुर्बीण असून, विद्यार्थ्यांना उच्च अभ्यासक्रम आणि करिअरबद्दल मोलाची माहिती मिळणार आहे. नागरिकांच्या सोयीसाठी पिण्याचे पाणी, खाद्यपदार्थांचे स्टॉल्स आणि वैद्यकीय सुविधांची व्यवस्था करण्यात आली आहे.

**प्रदर्शनात काय पाहाल?**

- जी.एम.आर.टी. दुर्बीण आणि रेडिओ स्ट्रॉनॉमीच्या इतिहासाची सविस्तर माहिती.
- तज्ज्ञ खगोल शास्त्रज्ञांशी थेट संवाद साधून शंकांचे निरसन करण्याची संधी.
- तंत्रज्ञांनी तयार केलेले विज्ञानविषयक लघुपट आणि विविध वैज्ञानिक प्रयोगांचे सादरीकरण.
- बलून फॅसिलिटी हैदराबादच्या वतीने वैज्ञानिक बलूनचे उड्डाण आणि त्याचे प्रात्यक्षिक.
- विविध वैज्ञानिक पुस्तके, खेळणी आणि शालेय व अभियांत्रिकी विद्यार्थ्यांचे नावीन्यपूर्ण प्रकल्प.

**रमजानुल मुबारक २०२६**
**रोजा नंबर ०९**

# " आत्मसुद्धी तुन जीवनाचा उद्देश सफल व्हावं."

पैगंबर मुहम्मद स्व.चे सहकारी, अबु हुरेरा (रजि )सांगतात ,''!! रोजा एक प्रकारे गुन्हा न करण्याची ढाल आहेत,''!! रोजाच्या स्थितीत तुम्ही कोणत्याही प्रकारची गुन्हेगारी, गुन्हा करुच शकत नाही, ; गुन्हां - अपराध करण्याचे विचार सुध्दा करु शकत नाही, तुमच्या बरोबर भांडणं - अपशब्द वापरत असेल तर, त्या व्यक्तीस सरळ सांगा , '' मै - रोजे- से - हुं ''( मला उपवास आहेत,) तर समोरील व्यक्ती अपशब्द- भांडण करणारा गुन्हा करणार नाहीत, हे जाणून ही त्याने अपशब्द वापरले तर ; ती व्यक्ती फार मोठ्या पापांचे भागिदार होईल.''( हादिस : सहीह बुखारी हा.न.१८९४). जीवन ईश्वराचे सर्वश्रेष्ठ वरदान आहे. जीवनाचा प्रत्येक क्षन अमूल्य आहे. गेलेला क्षण कोणत्याही परस्थिती पुन्हा कधीच मिळणार नाही. म्हणून प्रत्येक क्षण जगता आला पाहिजेत.

प्रत्येक मनाव हा अल्लाह ईश्वरराचा प्रतिनिधित्व करतो. निर्मिक (अल्लाह ईश्वर )नें सृष्टीतील प्रत्येक अनु रेणूला देखील अस्तिव दिलं आहे. प्रत्येक अनु रेणू हा महत्वाचं आहेत. प्रत्येकाला काही नां काही उद्देश दिलेलं आहेत. ते एका विशिष्ट तत्वावर कार्यरत आहेत. दिव्य कुर आन म्हणतं, '' आम्ही मानवाला उत्तम आकार देवून निर्माण केलेले आहेत. ''त्याला चांगले वाईट समजण्या साठी त्याला बुद्धी दिली, चांगलं वाईट पारखण्यासाठी क्षमता त्याच्या स्वभावात अंतर्भुत दिली,, त्याला आचार विचार करण्याचे स्वातंत्र्य दिलं, '' जीवनरूपी विवेक बुद्धी ची परीक्षा आहेत की तो कोणता मार्ग स्वीकारतो. त्यासाठीच त्याला आम्ही मार्गदर्शनांची व्यवस्था दिव्य कुरआन हा ईश्वरी ग्रंथ पाठवून व प्रेषित पैगंबर च्या माध्यमातून त्यांच्या सफलतेसाठी सदाचार करण्यासाठी मार्गदर्शन मार्गदर्शक करण्यासाठी पाठवलं. जीवन सफल व्होवं म्हणून संपूर्ण व्यवस्था केली. हें त्यासाठी की या सर्व मार्गदर्शनाच्या प्रकाशात त्यानं प्राप्त परिस्थितीमध्ये आपल्या क्षमता व प्रतिभांचा सर्वत्कृस्ट उपयोग करून जीवन सफल करावं. नकळतपणे जें चरस -गांजा -अफू - च्या आहारी गेलेले असतील, दारु पिऊन पडत असतील किंवा अनेक व्यसनांच्या आहारी गेलेले, व्यसनाधीन ,त्यांच्यामुळे घरात त्रस्त झालेल्या ,घरांची पैशाची राखरांगोळी केलेली - असेल, आशा बांधवांना, मित्रांना,रमजान महीना एक संधीच काळ चालून आलेला. कुठल्याही खर्चाची गरज नाही, कुठल्याही मोटीवहेशनल लिडर- - संमोहन तज्ञांची मदती शिवाय जडलेल्या घाणेरड्या व्यसनं सोडण्याची सुवर्ण संधी सध्या आलेली आहेत. मनापासून विचार करून इच्छा शक्ती निर्माण करण्याची .फक्त एकदा विचार करा . मनोमन तय्यार व्हा...आज संधी उपलब्ध आहेत .

रमजान महिन्यातील अनिवार्य (फर्जं) केलेले पवित्र रोजे (उपवास) आहेत. अल्लाह ( ईश्वर- भगवंत) ला संपूर्णपणे शरण जाणे, नितांत निष्ठा ठेउन सदाचाराने वागण्याची शपथ .त्यात एक चांगले काम हीं करू शकतात की आहारी गेलेल्याजवळच्या मित्रांला या चांगल्या उपक्रमात सहभागी होण्यास आमंत्रित करू शकतात, कारण अल्लाह (ईश्वर- परमेश्वर) हा कोणत्याही एका राष्ट्राचा किंवा धर्माचा नसुन , तो सर्व व्यापी सर्व जगाचा रब्बुल आलमीन आहेत, दिव्य कुरआन, ( सुरहा नं०१ अल - फातिहा मध्ये), '' जो सर्व सृष्टीचा पालनकर्ता आहे. ''रुब आहेत. संत ज्ञानेश्वर महाराजांनीं, '' पसायदान '' मध्ये, ''विश्वात्मक''असेच म्हणावे लागते, संपूर्ण सृष्टीचा एकच रब( पालणकर्ता - भगवंत )आहे. हाच (ईश्वर) अल्लाह सृष्टीच्या आणि सृष्टीतील सर्व कणां- कणांचा निर्माता- नियंता आहे. जर पुन्हा नकळत व्यसनांची आठवणी जाग्या झाल्या असतील तरी पुन्हा वर्ष भर तुम्हाला आठवड्यातून दोन - तीन वेळा नफील( फायद्यासाठी ) रोजे ठेऊ शकतात. बारा महिने विविध कारणांनी रोजे करत असतात . नफिल रोजे करण्याची पद्धत आहे . प्रेषीत मुहम्मद स्व.स्वतः सोमवारचा व गुरुवार व महीन्याच्या १४-१५-१६ तारखेलाही रोजा ठेवत. मुहर्रम च्या ९ वा, १० वा दिवस किंवा १० व ११ व्या दिवशी ज्याला '' यौमें आशुराहा '' चे रोजा आहे. काही बंधू एक दिवसाआड ही रोजा करतात.

नवसाचे हें रोजे असते, ''नवस'' व्यक्त करतात , नवस पुर्ण झाले तर दोन - चार - दहा रोजे करून सत्कार्य करू, आपल्या इच्छेप्रमाणे मागणी करण्याची पध्दत आहे. काही कळत - नकळतपणे चुका झाल्या असतील, चुकांच्या प्रायश्चित्त म्हणून किंवा स्वतः आत्मक्लेश म्हणून ही रोजा ठेवण्या बरोबरच सदका (दान) गोरगरिबांना अन्न दान ,आर्थिक दान देण्याची. जीवनरूपी हीं परीक्षा त्याच्या विवेकबुद्धीची परीक्षा आहेत की तो सत्यमार्ग स्वीकारतो की वाम मार्ग.??. या सर्व मार्गदर्शन केलेल्या प्रकाशात सध्याच्या प्राप्त परिस्थितीमध्ये संपूर्ण विचार करून जी व्यक्ती स्वतः ला, त्याच्या निर्मिकला आणि जीवनाच्या महान उद्देशाला ओळखुन त्यानुसार आपल्या क्षमता व प्रतिभांचा सदुपयोग करते, तीच व्यक्ती खऱ्या अर्थाने जीवनाचा उद्देश सार्थ करते. तर अल्लाह ( परमेश्वर - भगवंत ) ला सृष्टीतील प्रत्येक मानाव महत्वाचं आहे. म्हणून वाईट आचार विचार , राग - लोभ - मत्सर - अहंकार - मानसिकता याचं पुर्ण निर्मूलन करून जीवन सफल करावं. नाहीं तर, '' आणि त्या दिवशी ( कायमत - प्रलंयच्या- न्यायाच्या ) तुम्हाला दिलेल्या देणग्या बद्दल विचारले जाईल की, त्या (ईश्वर) अल्लाह च्या कृपा होत्या '' काय केलं. ( दिव्य कुरआन १०२ :८,).काय उत्तर द्याल.



**डॉ. सलीम शेख**
बैतुशशिफा मल्टिस्पेशालिटी दवाखाना.
श्रीरामपूर, जि. अहमदनगर
मो. ९२७१६४००१४

# खंडाळा अपघातातील मृतावर अंत्यसंस्कार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**


**खंडाळा :** श्रीरामपूर तालुक्यातील खंडाळा येथे बुधवारी झालेल्या मालवाहू ट्रक व स्विफ्ट कारच्या अपघातातील चार मृत व्यक्तीवर काल दुपारनंतर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

लोणी येथील प्रवरा रुग्णालयातून शवविच्छेदनानंतर एकाच कुटुंबातील या मृत व्यक्ती रुग्णवाहिकेतून श्रीरामपूर येथील सरस्वती कॉलनी येथे त्यांच्या राहत्या घरी आणण्यात आल्या. त्यामध्ये संगिता आण्णासाहेब चव्हाण,ऐश्वर्या अशोक चव्हाण, प्रशांत रमेश चव्हाण,सिद्धार्थ सुनिल चव्हाण यांचा समावेश होता.लोणीपासून रुग्णवाहीकेमागे नातेवाईक,मित्रपरिवार यांचा मोठ्या संख्येने मोटारसायकलचा व चारचाकी वाहनांचा ताफा होता. श्रीरामपूर येथील अमरधाममध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. नातेवाईकांचा आक्रोश मन हेलावून टाकणारा होता त्यामुळे अंत्यविधीस आलेल्यांना अश्रू आवरता आले नाही. प्रवरा रुग्णालयात असलेल्या तीनही जखमींवर उपचार सुरु आहेत.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

दखल

## परीट-धोबी सेवा मंडळ कोपरगाव शहराध्यक्षपदी नितीश बोरुडे



**कोपरगाव** : राष्ट्रसंत गाडगे महाराज जयंतीनिमित्त परीट-धोबी समाजात उत्साहाचे वातावरण असताना परीट-धोबी सेवा मंडळाच्या कोपरगाव शहराध्यक्षपदी नितीश बोरुडे यांची एकमताने निवड करण्यात आली. प्रदेशाध्यक्ष खडेराव कडलग व जिल्हाध्यक्षांच्या आदेशानुसार झालेल्या या निवडीबद्दल समाजबांधवांच्या वतीने त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला. संजीवनी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन राजेंद्र परजणे, भाजप दिव्यांग सेल कोपरगाव तालुकाध्यक्ष व माळी समाज जिल्हाध्यक्ष मुकुंद काळे तसेच महेश परजणे यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी विविध मान्यवर उपस्थित होते. सत्काराला उत्तर देताना बोरुडे यांनी संत गाडगे महाराजांच्या स्वच्छता व समाजहिताच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा निर्धार व्यक्त केला.

## जिल्हा माहेश्वरी महिला संघटना अध्यक्षपदी अनुराधा राठी



**बेलापूर** : अहिल्यानगर जिल्हा माहेश्वरी महिला संघटनेच्या सन २०२६ ते २०२८ या कालावधीसाठी नव्या कार्यकारिणीची सर्वानुमते निवड करण्यात आली. जिल्हाध्यक्षपदी अनुराधा राठी तर जिल्हा सचिवपदी रक्षा बुब यांची निवड झाली. निवड बैठकीत कोषाध्यक्ष म्हणून अचला झंवर, संघटन मंत्री म्हणून उषा मुंदडा, तर वरिष्ठ उपाध्यक्षपदी मीना मणियार यांचीही बिनविरोध निवड करण्यात आली. निवडणूक अधिकारी म्हणून खानदेश विभागाच्या सहसचिव राधा झंवर, रचना मालपाणी व राजश्री मिनियार उपस्थित होत्या. नवीन जिल्हाध्यक्ष अनुराधा राठी यांनी संघटनेच्या माध्यमातून महिलांचे प्रश्न सोडविण्यास प्राधान्य देणार असल्याचे सांगितले. जिल्ह्यातील माहेश्वरी समाजातील महिलांना एकत्र आणून विविध सामाजिक व प्रबोधनात्मक उपक्रम राबविण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाजवळ 'संविधान डिजिटल'चा शुभारंभ

**शिरसगाव** : हरेगाव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक परिसरात बुधवार, दि. २५ फेब्रुवारी २०२६ रोजी 'संविधान डिजिटल' या उपक्रमाचा उद्घाटन सोहळा उत्साहात पार पडला. हाऊस ऑफ विस्डम चर्च ग्रुप यांच्या वतीने धम्मदान म्हणून हा डिजिटल उपक्रम स्मारकाला अर्पण करण्यात आला. यावेळी पास्टर समीर आल्हाट यांनी डॉ. आंबेडकरांनी देशाला दिलेल्या संविधानाचे महत्त्व अधोरेखित करत त्यांच्या कार्याची कृतज्ञतापूर्वक आठवण केली. या उपक्रमासाठी पास्टर अनंत वाहूल, भालेराव, चक्रनारायण मिस्त्री व पास्टर तुपे यांचे सहकार्य लाभले. उद्घाटनप्रसंगी माजी सरपंच दिलीप त्रिभुवन, लोकनियुक्त सरपंच दीपक नवगिरे यांच्यासह अनेक भीमसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. परिसराच्या विकासासाठी सर्वांनी सढळ हस्ते धम्मदान करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

## 'एनएमएमएस' परिक्षेत उक्कलगावचे चार विद्यार्थी चमकले

**श्रीरामपूर** : राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना (एनएमएमएस) परिक्षा पार पडली.तालुक्यातील उक्कलगाव येथील खा.गोविंदराव आदिक ग्रामीण शिक्षण संस्था,अशोकनगर संचलित न्यू इंग्लिश स्कूल व रावसाहेब बाळाजी पा.थोरात कला कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त केले.या'एनएमएमएस' परिक्षेसाठी एकूण ०८ विद्यार्थी बसले होते.त्यातील ०४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहे.विद्यालयाचा एकूण निकाल ५०% टक्के लागला आहे. यामध्ये समर्थ रामेश्वर थोरात,समर्थ मनोज धनवटे,वेदिका सतीश थोरात,सृष्टी योगेश रोकडे, या विद्यार्थ्यांनी विशेष गुणवत्ता मिळविली आहेत.

## अतिवृष्टीमुळे पाणी पातळी वाढली

**पुणतांबा** : चालू वर्षी सरासरीपेक्षा अधिक पर्जन्यमान झाल्याने पुणतांबा परिसरातील भूगर्भातील पाण्याची पातळी वाढली असून विविध विकासकामांना अडथळे निर्माण होत आहेत. रेल्वेसह इतर विभागांना खोदकाम करताना पाणी लागल्यामुळे अडचणींचा सामना करावा लागत आहे. पुणतांब्याचे सरासरी पर्जन्यमान सुमारे ५०० मिमी आहे; मात्र यंदा ते अंदाजे ६५० मिमीपर्यंत पोहोचल्याची माहिती मिळते. २४ सप्टेंबर रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले होते. सततच्या पावसामुळे ओढे-नाल्यांमध्ये अजूनही पाणी साचले असून भूजलपातळी लक्षणीयरीत्या वाढली आहे. नवीन रेल्वे फाटकाच्या उत्तर बाजूस सुरू असलेल्या भुयारी पुलाच्या (अंडरपास) कामादरम्यान अवघ्या १७ फूट खोलीवर पाणी लागल्याने कामात विलंब झाला. तसेच पुणतांबा-वाकडी रस्त्यावरील भुयारी पुलाच्या कामातही अशीच परिस्थिती निर्माण झाली आहे. एकूणच, परिसरात कोणतेही खोदकाम करताना पाणी लागत असल्याने कामांची गती मंदावली आहे.

# मुख्यमंत्र्यांकडून लेखी आदेश मिळे पर्यंत लाँग मार्च सुरूच

## किसानसभेचे केंद्रीय सचिव डॉ.अजित नवले यांचा सरकारला इशारा



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने सरकारकडे केलेल्या मागण्यां बाबत पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री आणि इतर मंत्र्यांच्यासमोर किसान सभेच्या शिष्टमंडळाची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.या बैठकीत विविध प्रलंबित प्रश्नांवर सकारात्मक चर्चा झाली. मात्र ही चर्चा सरकारने तोंडी न करता लेखी स्वरूपात निर्णय द्यावा, अशी ठाम भूमिका किसान सभेने घेतली आहे.

जोपर्यंत सरकार आमच्या मागण्या मान्य केल्याचे लेखी स्वरूपा मध्ये देत नाही, तोपर्यंत किसानसभेचा हा लाँग मार्च सुरूच राहील, असा खणखणीत इशारा अखिल भारतीय किसान सभेचे राष्ट्रीय सचिव डॉ. अजित नवले यांनी राज्य सरकारला दिला आहे. अखिल भारतीय किसान सभा व सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन या संघटनांच्या वतीने शेतकरी कामगार अर्धवेळ पारिचारिका शालेय पोषण आहार शिजवणाऱ्या महिला अंगण वाडी मदतनीस सेविका यांनी सर्वांनी एकत्रित येत अकोले तालुक्यातील राजूर प्रकल्प कार्यालयात निवेदन देऊन लाँग मार्चला सुरुवात झाली. हा लाँग मार्च अकोले, तालुक्यातून सायंकाळी संगमनेरात दाखल झाला.

नवीन नगर रोड येथील प्रांताधिकारी कार्यालयाच्या समोर रात्रभर थांबले आणि गुरुवारी दुपारी लोणीच्या दिशेने हा लाँग मार्च मार्गस्थ झाला या लाँग मार्चमध्ये अखिल भारतीय किसान सभेचे केंद्रीय सचिव डॉ. अजित नवले, किसान सभेचे राज्याध्यक्ष उमेश देशमुख, कौन्सिल सदस्य उद्धव पौळ, दीपक लिपने, अमोल वाघमारे, जितेंद्र चोपडे, धर्मा शिंदे अशोक थोरात यांच्यासहअकोले संगमनेर तालुक्यासह संपूर्ण अहिल्या नगर जिल्ह्यातून हजारोंच्या संख्येने आदिवासी बंधू-भगिनी या लाँग मार्चमध्ये सहभागी झाले होते.

पूर्वी बदलण्यात आलेला पुणे नाशिक रेल्वेमार्ग संगमनेर तालुक्या तील बोटा व अकोले तालुक्यातील देवठाण मार्गे जाईल, असे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी देवठाण येथे येऊन जाहीर केले होते. त्यांच्या मुख्यमंत्र्यांपासून ते पंतप्रधानांपर्यंत थेट संपर्क असल्याने त्यांनी या प्रश्नात लक्ष घालावे, रेल्वे मार्गाच्या सर्वेसाठी एक हजार कोटी रुपये खर्च झाला असल्याचा दावा करण्यात आला आहे. रेल्वे मार्गाच्या सर्वे मध्ये जो भ्रष्टाचार झाला त्याची कसून चौकशी करण्यासाठी स्वतंत्र समिती नेमावी. आवश्यक असल्यास तज्ञांची नावे आम्ही देऊ, असा ही खणखणीत इशारा अखिल भारतीय किसान सभेचे केंद्रीय सचिव डॉ अजित नवले यांनी यावेळी दिला.

### आंदोलकांच्या या होत्या मागण्या

वन जमिनी, गायरान जमिनी कसणाऱ्या शेतकऱ्यांच्या दाव्यांची पुन्हा पडताळणी करावी, घराच्या तळ जमिनी नावे व्हाव्यात, बांधकाम कामगारांना सर्वच आजारांसाठी मेडिक्लेम योजना लागू करावी, पुणे नाशिक हायस्पीड रेल्वे देवठाण, बोटा स्टेशनसह पूर्वीच्या सर्वेप्रमाणे व्हावी, शालेय पोषण आहार कर्मचारी, अर्ध वेळ परिचर, अंगणवाडी, आशा, ग्रामपंचायत कर्मचारी,यांच्या मानधना मध्ये व मोबदल्यात रास्त वाढ करून त्यांना शासकीय कर्मचारी म्हणून दर्जा द्यावा. भंडारदरा परिसरातील आदिवासी शेतकऱ्यांना सिंचनासाठी व पिण्यासाठी शासकीय योजनेतून पाणी उपलब्ध करून द्यावे.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे आमच्या मागण्यांबाबत मुख्यमंत्र्यांशी चर्चा करत असून, राज्यमंत्रिमंडळा च्या बैठकीत निश्चितच सकारात्मक निर्णय होईल, मात्र चर्चा आणि मोर्चा हे दोन्ही एकाच वेळी सुरू राहतील,
**डॉ अजित नवले, केंद्रीय सचिव, अखिल भारतीय किसान सभा**

### शोषण थांबवण्याची जबाबदारी पालकमंत्र्यांचीच

पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्याशी आमची कोणतीही वैयक्तिक दुश्मनी नसून, जिल्ह्याचे पालकत्व स्वीकारल्याने शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांपासून ते पाण्यासाठी मैलोनमैल पायपीट करणाऱ्या महिलांचे शोषण थांबवण्याची जबाबदारी त्यांच्यावर आहे. ते यासाठी सकारात्मक पावले उचलतील, असा विश्वास किसान सभेने व्यक्त केला आहे. सरकारने लाँग मार्चची दखल घेऊन मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा किसान सभेच्या वतीने देण्यात आला.

## अगस्ती ऋषि आश्रमात त्रिदिनात्मक सोहळ्यास धर्मध्वजारोहनाने प्रारंभ



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : नेवासा बुद्रुक शिवारातील प्रवरानदीच्या तीरावर असलेल्या श्रीराम अगस्ती ऋषि आश्रमाच्या ९ व्या वर्धापनदिनाच्या निमित्ताने आयोजित त्रिदिनात्मक ज्ञानेश्वरी पारायण व किर्तन महोत्सवास गुरुवारी दि.२६ फेब्रुवारी रोजी आश्रमाचे महंत ज्ञानगिरी महाराज व महंत गंगागिरी महाराज यांच्या हस्ते धर्म ध्वजारोहण करून प्रारंभ करण्यात आला.

यावेळी श्रीराम अगस्ती ऋषि आश्रम प्रांगणात झालेल्या कार्यक्रम प्रसंगी अगस्ती आश्रमाचे महंत ज्ञानगिरी महाराज, महंत गंगागिरी महाराज, पारायण व्यासपीठ चालक हभप भानुदास महाराज भिसे, योगेश महाराज होन इन्शुरन्स कंपनीचे विकास अधिकारी किशोर गारुळे, गोकुळ जायगुडे, पुंजाराम महाराज पेचे, भिकाजी सोमासे यांच्या हस्ते वेदमंत्राच्या जयघोषात ध्वज पूजन करण्यात आले. यावेळी झालेल्या धर्मध्वजारोहण कार्यक्रम प्रसंगी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर माऊली पेचे, नानासाहेब डौले, भीमराज माने, संभाजी रेडे, पुंजाराम महाराज पेचे, अगस्ती तरुण मंडळाचे सर्व सेवेकरी पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या त्रिदिनात्मक सोहळयामध्ये पहाटे ४ ते ६ काकडा, ६ ते ७ विष्णू सहस्त्रनाम, सकाळी ७ ते ११ ज्ञानेश्वरीच्या अठराव्या अध्यायातील पारायण, ११ते १ महाप्रसाद,दुपारी ४ ते ५ प्रवचन, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, ७ ते ९ यावेळेत हरिकीर्तन असे दैनंदिन कार्यक्रम होणार आहे.

अगस्ती ऋषि मंदिराच्या ९ व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने होणाऱ्या धार्मिक कार्यक्रमाचा व किर्तन श्रवणाचा पंचक्रोशीतील भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन अगस्ती ऋषि आश्रम भक्त परिवार व अगस्ती ऋषी तरुण मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## ज्ञानेश्वर कारखाना कामगाराचे वारसांना आर्थिक मदत



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**भेंडा** : येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना सांस्कृतिक मंडळाकडून मयत कामगारांचे वारसांना देण्यात येणाऱ्या आर्थिक मदतीचे सहा लाख रूपयांचे धनादेश कारखान्याचे अध्यक्ष माजी आ.नरेंद्र घुले पाटील यांचे हस्ते प्रदान करण्यात आले. भेंडा येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर साखर कारखाना कारखान्याचे गेस्टहाऊस विभागातील कर्मचारी कै. राजेंद्र रामचंद्र क्षीरसागर यांचे हृदयविकाराने तर इंजिनिअरिंग विभागातील कर्मचारी कै. भाऊसाहेब पंढरीनाथ मिसाळ यांचे प्रदीर्घ आजाराने निधन झाले होते.

ज्ञानेश्वर कारखाना व्यवस्थापन व सांस्कृतिक मंडळ यांचे संयुक्त निधीतून मयत कामगारांचे वारसांना प्रत्येकी तीन लाख रुपयांची मदत केली जाते. त्यानुसार कै. राजेंद्र क्षीरसागर यांच्या पत्नी संगीता क्षीरसागर व कै.भाऊसाहेब मिसाळ यांच्या पत्नी लताबाई मिसाळ यांना कारखान्याचे अध्यक्ष माजी आ. नरेंद्र घुले यांचे हस्ते धनादेश देण्यात आले. संचालक शिवाजीराव कोलते, कार्यकारी संचालक अनिल शेवाळे, जनरल मॅनेजर रवींद्र मोटे, कामगार संचालक सुखदेव फुलारी, प्रशासकीय अधिकारी कल्याण म्हस्के, कामगार कल्याण अधिकारी बाळासाहेब डोहाळे,राजेंद्र काकडे, संस्कृतीक मंडळाचे मानस सचिव आप्पासाहेब बोडखे, इब्राहिम सय्यद, मल्हारी कदम, गणेश क्षीरसागर, सतीश शिंदे, आकाश मिसाळ आदि यावेळी उपस्थित होते.

## शिवरस्त्यासाठी शेतकऱ्यांचा उपोषणाचा इशारा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गणोरे** : धांबोडी फाटा - शिंदळी डोंगर - पिंपळगांव निपाणी शिवरस्ता लवकरात लवकर मोकळा करण्यात यावा अशी मागणी परिसरातील शेतकरी गेल्या एक वर्षापासून पत्रव्यवहाराने पाठपुरावा करत आहे. तरी त्या संदर्भात कोणतीही कार्यवाही होत नाही. धांबोडी फाटा - पिंपळगाव निपाणी - शिंदळी डोंगर हा शिवस्ता अतिक्रमण मुक्त करुन लवकरात लवकर म् वहातुकी योग्य करण्यात यावा अन्यथा सोमवार दि. २ मार्च २०२६ पासून संबंधित शेतकरी तहसील कार्यालयासमोर उपोषण करणार असल्याची मागणी गणोरे सोसायटीचे अध्यक्ष भगवान खतोडे व परिसरातील शेतकऱ्यांनी तहसीलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. आमदार साहेबांच्या १० ऑक्टोबर २०२५ च्या आम सभेत टोकन क्रमांक २३९ प्रमाणे तक्रार दाखल असताना देखील याबाबत कोणतीही कार्यवाही होताना दिसत नाही.

त्यामुळे शेतकऱ्यांनी उपोषणाचा पर्याय निवडला आहे. यासंदर्भात चे निवेदनाच्या प्रति जिल्हाधिकारी, प्रांत, तालुक्याचे लोकप्रतिनिधी डॉ. किरण लाहमटे, तहसीलदार, ग्रामपंचायत, कामगार तलाठी यांच्याकडे देण्यात आले आहे. शेतकऱ्यांना शेती मशागती साठी, शेतीची अवजारे ने आण करण्यासाठी ट्रॅक्टर, बैलगाडी, दुचाकी, ट्रक ने आण करणे अवघड झाले आहे. हा शिवरस्ता मोकळा करण्याची गेल्या अनेक दिवसापासून ची मागणी आहे. यासंदर्भात ग्रामपंचायत, कामगार तलाठी, तहसीलदार यांच्याकडे अनेक वेळा मागणी केली आहे. परंतु दखल घेतली नाही. येत्या २ मार्च पर्यंत हा रस्ता मोकळा न झाल्यास गणोरे पंचक्रोशीतील शेतकरी तहसीलदार कार्यालयासमोर उपोषण करणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

## मेक्लॉईड फार्मासिटिकल या मल्टिनॅशनल कंपनीत ७० विद्यार्थ्यांची निवड

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लोणी** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील पद्मश्री विखे पाटील महाविद्यालयात मेक्लाइड फार्मासिटिकल या मल्टिनॅशनल कंपनी तारापूर, मुंबई यांच्या वतीने परिसर मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते या मुलाखतीमध्ये एकूण १७३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला त्यातून ७० विद्यार्थ्यांची निवड कंपनीच्या अधिकाऱ्यांनी केली.




अशी माहिती उपप्राचार्य डॉ. आर.ए.पवार यांनी दिली. कंपनीच्यावतीने विद्यार्थ्यांची लेखी व मौखिक परीक्षा घेऊन जे पात्र विद्यार्थी आहेत त्यांना निवडीचे प्रमाणपत्र देण्यात आले. या मुलाखती घेण्यासाठी रोहिदास पानसरे आणि मयंक जैन या दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रथम सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना कंपनीच्या उपक्रमांची माहिती दिली. कंपनीमध्ये कोणकोणत्या स्वरूपाचे काम केले जाते याची माहिती देताना नव्याने भरती होणाऱ्या विद्यार्थ्यांना कोणत्या स्वरूपाचे काम करावे लागणार आहे याची परिपूर्ण माहिती देऊन त्यांची लेखी व मौखिक परीक्षा घेतली. या उपक्रमासाठी महाविद्यालयाच्या प्लेसमेंट सेलचे अप्पासाहेब शेळके, डॉ. हरिभाऊ दुबे, डॉ.शांताराम चौधरी, डॉ. राजेंद्र गायकर यांनी यासाठी सातत्याने विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती केली व त्यांना विविध क्षेत्रामध्ये करिअर करण्यासाठी प्रवृत्त केले.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे भारत घोगरे, डॉ.शिवानंद हिरेमठ, संस्थेचे शिक्षण संचालक डॉ. प्रदीप दिघे, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. आर.ए. पवार यांनी अभिनंदन केले.

## पाडेगाव येथे मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्राच्या बांधकामाचे भूमिपूजन संपन्न

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगाव येथे प्रस्तावीत असलेल्या पाडेगाव ऊस संशोधन केंद्राची नवीन प्रशासकीय इमारत, शेतकरी प्रशिक्षण इमारत तथा अतिथीगृह आणि कर्मचारी निवासस्थान बांधकामाचे महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. विलास खर्चे यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. याप्रसंगी संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, विद्यापीठ अभियंता मिलींद डोके, संशोधन केंद्राचे ऊस विशेषज्ञ डॉ. राजेंद्र भिलारे उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करतांना कुलगुरू डॉ. विलास खर्चे म्हणाले की पाडेगाव ऊस संशोधन केंद्र सन २०३२ मध्ये शताब्दी वर्ष पूर्ण करणार आहे.



पाडेगाव ऊस संशोधन केंद्राच्या आतापर्यंतच्या गौरवशाली संशोधन कार्याची शासन स्तरावर नोंद घेवून सदरचे संशोधन केंद्र आंतरराष्ट्रीय दर्जाचे होण्यासाठी आवश्यक असणार्या प्रयोगशाळा तसेच प्रक्षेत्रावर विविध सुविधा, केंद्रावर कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी कर्मचारी निवासस्थान तसेच केंद्राला भेट देण्यासाठी येणाऱ्या कृषि अधिकारी, ऊस कारखान्यांचे अधिकारी व शेतकरी यांची राहण्याची व्यवस्था, प्रशिक्षणासाठी प्रशिक्षण केंद्रासाठी भरीव निधी शासनाने उपलब्ध करून दिला. मागील ९३ वर्षापासून या संशोधन केंद्राने अधिक उत्पन्न आणि साखर उतारा देणारे १७ सुधारीत वाण प्रसारीत केलेले असनू अर्थिकदृष्ट्या किफायतशीर ऊस लागवड तंत्रज्ञानासंबंधी ११० शिफारशी दिल्या आहेत.

राज्यात ऊस लागवडीखालील असलेल्या एकूण ७५ टक्के क्षेत्रावर या संशोधन केंद्राने प्रसारीत केलेल्या फुले २६५ आणि को ८६०३२ या दोन वाणांखाली क्षेत्र असून त्यामधून राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना रू.१,००,७८७ कोटीचा निव्वळ नफा मिळालेला आहे.

एकंदरीत महाराष्ट्रातील ऊस शेती व त्यावर आधारीत साखर उद्योग यांच्या भरभराटीत या संशोधन केंद्राने मोठे योगदान दिले आहे. महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री ना. दत्तात्रय भरणे, माजी कृषीमंत्री ड. माणिक कोकाटे यांचे सहकार्याने हा निधी उपलब्ध झाला. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे व पुणे येथील महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे उपाध्यक्ष तथा सेवा प्रवेश मंडळाचे अध्यक्ष तुषार पवार यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा, कृषिच्या उपसचिव प्रतिभा पाटील यांचे सहकार्य आणि संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, माजी संशोधन संचालक, डॉ. विठ्ठल शिर्के यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

जा.क्र./ ६२८/२०२६
दिनांक २६/०२/२०२६

कार्यालयाचा पत्ता-
धर्मादाय उप आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
दुसरा मजला, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत,
आकाशवाणी समोर, सावेडी,
अहिल्यानगर-४१४००३.

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालय, अहमदनगर विभाग, अहिल्यानगर

**जाहीर नोटीस**

(महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ नियम ७ व ७ अे वाचावे)

बदल अहवाल क्रमांक: DYCC/७७२/२०२४

ज्याअर्थी, श्री स्थानकवासी जैन संघ श्रीरामरपूर ता. श्रीरामपूर जि. अहिल्यानगर, न्यास नोंदणी क्र. ए.-१६८ (अहिल्यानगर) या सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेच्या सादरकर्ता श्री.रमेश इंद्रभान लोढा यांनी बदल अर्ज चौकशी क्रमांक ७७२/२०२४ यामध्ये बदला करिता उपरोक्त बदल अहवाल सादर केलेला आहे व तो धर्मादाय उप आयुक्त यांनी दिनांक ०५/०२/२०२६ रोजी तात्पुरता स्विकृत केलेला आहे, त्याअर्थी, हितसंबंध असलेल्या सर्व संबंधीत लोकांना सदर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, सदर बदल अहवालास आपणास काही आक्षेप / हरकत घ्यावयाची असल्यास, आपण आपली हरकत सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत धर्मादाय उपआयुक्त यांचेसमोर दाखल करावी, अन्यथा, सदर बदल अहवालास आपली काहीही हरकत नाही, असे समजून सदर बदल अर्जावरती दिनांक ३०/०३/२०२६ रोजी अंतिम आदेश करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २६ रोजी माहे ०२ सन २०२६ माझ्या सहीनिशी व धर्मादाय आयुक्तांच्या शिक्क्यानिशी दिली.

न्याय लिपिक
शिक्का
अधिक्षक (न्याय),
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अहिल्यानगर विभाग, अहिल्यानगर,

जा.क्र.६२७/२०२६
दिनांक २६/०२/२०२६

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अहिल्यानगर विभाग, अहिल्यानगर
नवीन प्रशासकीय इमारत,
आकाशवाणी केंद्रासमोर, सावेडी
अहिल्यानगर - ४१४००३.

**चौकशीची जाहीर नोटीस**

बदल अर्ज क्रमांक : १२२/२०१७
ट्रस्टचे नाव : स्थानकवासी जैन संघ
ट्रस्टचा संपूर्ण पत्ता : श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर
ट्रस्टचा नोंदणी क्रमांक : ए-१६८

अर्जदार :- श्री रमेश इंद्रभान लोढा, मु.पो. श्रीरामपूर, ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, धर्मादाय उपआयुक्त अहिल्यानगर विभाग अहिल्यानगर हे वर नमुद केलेल्या अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२ नुसार अर्ज

१. वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?

२. खाली निर्दिष्ट केलेली मिळकत न्यासाच्या मालकीची आहे काय ?

अ. स्थावर मालमत्ता :-

१. कायम खरेदी खत शेत जमीन मौजे श्रीरामपूर, ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर येथील खरेदी खत क्र :- २२५३/२००१ दि. २९/०६/२००१ सर्व्हे नं. ६६ सिटी सर्व्हे नं. ११३० पालिका प्लॉट नं. ९९५ म्युन्सिपल घर नं. १७१०/३८२६ क्षेत्र १०२.०१ चौ.मी लांबी - पूर्व पश्चिम १८.५ मी, दक्षिण - उत्तर ५.५ मी खरेदी मूल्य रु.१,६०,०००/- (अक्षरी एक लक्ष साठ हजार फक्त) ज्याची चतुः- सीमा खालीलप्रमाणे :-

पूर्व : सिटी सर्व्हे नं ९११
पश्चिम : सिटी सर्व्हे नं ११३१
दक्षिण : सिटी सर्व्हे नं १२२७
उत्तर : सिटी सर्व्हे नं ११२९

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असल्यास अगर पुरावा देणेचा असल्यास त्यांनी लेखी कैफीयत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुर्ण केली जाईल व अर्जाचे निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जातील. मा. धर्मादाय उप आयुक्त साहेब, अहिल्यानगर यांचे शिक्यानिशी आज दिनांक :- २६/०२/२०२६. रोजी दिली.

व. लिपिक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अहिल्यानगर विभाग अहिल्यानगर

अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अहिल्यानगर विभाग अहिल्यानगर

पान १ वरुन

## भ्रमातून बाहेर पडा, विकासात योगदान द्या

१२९ युनिकॉर्न पैकी २८ इथे आहेत. कुंभमेळ्यावर बोलताना ते म्हणाले, कुंभमेळ्यामुळे महाराष्ट्राचे जागतिक ब्रँडिंग होईल. यूपीप्रमाणे गुंतवणुकीचा परतावा मिळेल. पर्यावरणसाठी उपाययोजना करत आहोत.

सरकारी नियुक्त्यांवर बोलताना फडणवीसांनी सांगितले की, महायुती सरकारने १ लाख २० हजार ४४९ लोकांना नियुक्ती दिली आहे. हा आकडा दीड लाखांपर्यंत जाईल. नव्या भरतीचे सत्र सुरू करत आहोत. गडचिरोलीत २ लाख ६८ हजार कोटींची गुंतवणूक होत असून, स्थानिकांना प्राधान्य दिले जात आहे. ९० टक्के कामगार स्थानिक, आदिवासी आणि दलित आहेत.

एसीबीच्या छाप्यांवर बोलताना फडणवीस म्हणाले, एसीबीचे छापे सुरूच राहतील. मंत्री किंवा माझ्या कार्यालयातही छापा पडू शकतो. परवानगीची गरज नाही. नरहरी झिरवाळ प्रकरणावरही त्यांनी भूमिका मांडली. दावोस करार, ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था आणि विरोधकांना दिलेल्या प्रत्युत्तराने फडणवीसांच्या भाषणाने सभागृहात चर्चेची धूम उठवली. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ६६० बिलियन डॉलरपर्यंत पोहोचली असून, पुढील ४-५ वर्षांत ट्रिलियन डॉलर होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली.

दावोस करारामुळे झालेले बदल दावोस करारावर बोलताना फडणवीस म्हणाले, दावोस इज व्हेरी सिरीअस बिझनेस. ४८ करारांपैकी ८८ टक्के अंमलबजावणीत. देशात ३५ टक्के अंमलबजावणी असते, महाराष्ट्राने ५५ टक्के केला, दावोसचा ७५ टक्के. गुंतवणुकीत ३९ टक्के एफडीआय महाराष्ट्रात. स्कोडा, टेस्ला, टाटा, कोका कोला, अमेझॉन, मायक्रोसॉफ्ट, गुगल, मेटा यांसारख्या कंपन्यांची गुंतवणूक. उत्सव केल्याने मार्केटिंग होते. डोनाल्ड ट्रम्पही २ दिवस राहतात.

## जिल्हा परिषद अन् पंचायत समितीमध्येही स्वीकृत सदस्य

मागणी केली होती. ग्रामीण राजकारणाच्या दृष्टीने सरकारचा हा महत्त्वाचा निर्णय आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांतर्गत जिल्हा परिषदेत ५ आणि पंचायत समितीमध्ये २ सदस्यांची स्वीकृत सदस्य म्हणून नेमणूक करण्यासाठी जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमात सुधारणा करण्यात यावी, अशी मागणी यापूर्वीच महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पत्राद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती. मुख्यमंत्र्यांनी या विषयावर सकारात्मक प्रतिसाद देत ग्रामविकास विभागाला कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार, आता राज्य मंत्रिमंडळाच्या कॅबिनेट बैठकीत या निर्णयावर शिक्कामोर्तब झाल्याची माहिती आहे.

## रोहित पवारांची सीआयडीकडे धाव

एफआयआर दाखल करणे हा आमचा अधिकार आहे. अपघातात मृत्यू झाल्याने 'अकस्मात मृत्यू' (एडीआर) नोंदवून तपास सुरू असल्याचे सांगण्यात आले. मात्र, डीजीसीएने कंपनीला जबाबदार धरले तरी आजपर्यंत एफआयआर का नाही?पवारांनी स्पष्ट केले की, सीआयडी तपास करत असल्याने पोलीस एफआयआर घेऊ शकत नाहीत, असे सांगितले जात आहे; पण असा कोणताही नियम नाही.

सर्वोच्च न्यायालयाच्या दोन निकालांचा अभ्यास करूनही यश मिळाले नाही. पोलीस सहकार्य करत नसल्यामुळे सीआयडी प्रमुखांची भेट घेतली. हे प्रकरण गंभीर असून, कंपनीविरोधात कारवाई होणे आवश्यक आहे, असेही त्यांनी नमूद केले. रोहित पवारांच्या या भूमिकेमुळे राजकीय वातावरण तापले आहे.

# कोपरगाव नगरपरिषदेच्या वित्तीय अंदाजपत्रकास बहुमताने मंजुरी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** :नगरपरिषदेच्या वित्तीय वर्ष २०२६-२७ अंदाजपत्रकास मंजुरी देण्याचा एकच विषयासाठी सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती.पालिकेकडून अतिशय महत्वाचे निर्णय घेण्यात आलेले आहेत त्याबद्दल सकारात्मक चर्चा होऊन सभा पार पडली. पुन्हा नवीन रस्ते खोदून पाइपलाइन केल्यास नुकसान जनतेच्या पैशाचे होते व कामेही खराब होतात त्यामुळे काही काळात हा प्रश्न सोडवला जाईल अशी भूमिका नगराध्यक्ष पराग संधान यांनी मांडली आहे. पाण्याच्या बाबतीत तीस ते चाळीस टक्के कामकाज पूर्ण केले त्यातच स्वच्छ पाणी शहराला येऊ लागले

### कोपरगाव नगरपरिषद अर्थसंकल्प अवास्तव

**कोपरगाव नगरपरिषदेच्या अर्थसंकल्पात उत्पन्न व खर्चामध्ये मोठी तफावत असून अर्थसंकल्प अवास्तव असल्याची टीका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नगरसेवक जनार्दन कदम यांनी केली. नगरपरिषदेचे मुख्य उत्पन्न मालमत्ता कर, पाणीपट्टी व भाडे असून ९.५ कोटींची करआकारणी दाखवली असली तरी मागील वर्षी केवळ ४ कोटींची वसुली झाल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. प्रलंबित देणी सुमारे १२ कोटींची असून पाटबंधारे विभागाची थकबाकी भरण्यासाठी तरतूद नसल्याचा आरोप त्यांनी केला. शास्ती प्रस्ताव अंतिम टप्प्यात असताना संभाव्य उत्पन्नाचा समावेश केल्याबाबतही त्यांनी प्रश्न उपस्थित केले. दरम्यान, पत्रकारांना प्रवेश न देणे ही सत्ताधाऱ्यांची मनमानी असल्याची टीका नगरसेवक हाजीमेहमूद सय्यद यांनी केली.**

स्वच्छतेच्या बाबतीत काम होते आहे मात्र अधिकच्या दर्जेदार सुधारणा पुढील महिन्यात दिसू लागतील तसेच ढापे दुरुस्ती,किरकोळ कामे आणि मुख्यत्वेकरून काही रस्त्यांचा कामाला सुरुवात करण्यापूर्वी पाईपलाईनचे काम पूर्ण करून घेण्यावर भर आहे कारण रस्ते झाल्यानंतर आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी स्नेहलताताई कोल्हे, युवा नेते विवेक कोल्हे यांच्यासमवेत भेट घेतली व चर्चा केली होती त्यानुसार येत्या काही दिवसात शंभर टक्के शास्ती माफीचा निर्णय होणार आहे. विश्वासनामा पूर्ण करण्याच्या दृष्टीने आमचे कामकाज सुरू असून



पालिकेच्या मालकीची स्वत:ची रुग्णवाहिका लवकरच घेतो आहोत जी नागरिकांना आरोग्याच्या दृष्टीने मोलाची ठरणार आहे. यावेळी उपनगराध्यक्ष जितेंद्र रणशूर,सर्व नगरसेवक,पालिका अधिकारी उपस्थित होते. महिला भगिनींच्या दृष्टीने सार्वजनिक स्वच्छता गृहांचा प्रश्न महत्वाचा असून तो प्राधान्याने सोडविण्यावर भर देतो असून त्यादृष्टीने काम करणार आहोत.यासह आमच्या विश्वासनाम्यात दिलेले आश्वासने पूर्ण करण्यासाठी आमचे काम सुरू असून सगळेच विषय एकत्र न घेता त्यासाठी टप्प्याटप्प्याने तरतूद आणि निर्णयासाठी अनुकूल स्थिती पाहून कार्यवाही करणार असल्याचे नगराध्यक्ष म्हणाले.

## निधन वार्ता

### ज्ञानदेव खांदे



**राहुरी** : देवळाली प्रवरा येथील खांदे वस्तीवरील शेतकरी ज्ञानदेव गंगाधर खांदे (वय-६५) यांचे नुकतेच हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, पुतणे, सुना, नातवंडे असा परिवार आहे. गणेश व तुकाराम खांदे यांचे ते वडील होत.

### लक्ष्मण गुडदे



**महालगाव** : वैजापूर तालुक्यातील वक्ती येथील प्रगतशील शेतकरी लक्ष्मण तुकाराम गुडदे वय (९२) यांचे गुरुवारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, चार मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. आधार जलदुत समिती सदस्य फकिरचं लक्ष्मण गुडदे यांचे ते वडील होत.

### रुक्मिणी शिंदे




**लोणी** : राहाता तालुक्यातील बाभळेश्वर येथील रुक्मिणी सदाशिव शिंदे यांचे वयाच्या सत्ता ८७ व्या वर्षी दु:खद निधन झाले. त्यांच्या पश्चात सहा मुली एक मुलगा, सुना, नातू, नाती, पुतण्या, पुतणे, असा परिवार आहे.
त्या रामभाऊ आणि साहेबराव बाबाजी शिंदे यांच्या भावजई तर नारायण सदाशिव शिंदे यांच्या त्या मातोश्री होत्या.

## जि. परिषद शाळांना ना. विखे यांच्याकडून चार इंटरऍक्टिव्ह बोर्ड भेट

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान:** जिल्हा परिषदेच्या शाळेतील मुलांना आधुनिक व कॅम्प्यूटरव्दारे शिक्षण मिळावे व गावातील सर्व शाळा डिजीटल व्हाव्या या उद्देशाने गावातील प्रत्येक शाळांना ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या निधीतून चार जिल्हा परिषद शाळांना इंटर ऍक्टिव्ह बोर्ड भेट देण्यात आले. याचे उद्घाटन व वितरण माजी सभापती नानासाहेब पवार यांच्या हस्ते करण्यात आले. सदर वितरणाचा कार्यक्रम जि. परिषद वस्ती शाळा खंडोबा वाडी येथे संपन्न झाला.यामध्ये जि.प.शाळा-टाकळीभान ,जि.प.शाळा खंडोबा वस्ती जि.प. शाळा दाभाडे वस्ती, या जि. प. शाळा लक्ष्मीवाडी या चार जिल्हा परिषदेच्या शाळांना इंटरऍक्टिव्ह बोर्ड मिळाले.



या कार्यक्रम याप्रसंगी अशोकचे मा. व्हा चेअरमन दत्तात्रय नाईक.
माजी तंटामुक्ती अध्यक्ष बाबासाहेब बनकर, टाकळीभानचे उपसरपंच कान्हा खडागळे, नानासाहेब लेलकर,प्रवीण बनकर, प्रेमसिंग परदेशी, राजेंद्र देवळाकर, दत्तात्रय म्हस्के, जि प. केंद्र शाळेचे मुख्याध्यापक गायकवाड सर, लक्ष्मीवाडी जि. प. शाळेचे मुख्याध्यापक क्षीरसागर, दाभाडे वस्ती शाळेच्या मुख्याध्यापिका औचर, व खंडोबा वस्ती शाळेचे मुख्याध्यापक शिंदेउपस्थित होते. इंट्रेक्टीक बोर्डमुळे विदयार्थी व पालक वर्ग यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून झाला. उपस्थित पालक आणि विदयार्थी यांनी ना. विखे साहेबांचे धन्यवाद मानले.
या प्रसंगी खंडोबा वाडी वस्ती शाळेस सुरेश मुळे यांच्याकडून दोन पाण्याचे जार शाळेला भेट देण्यात आले. तसेच खंडोबावस्ती शाळेस अमोल पटारे यांच्या समन्वयातून ग्लोबल नगरी यांच्याकडून वाटर फिल्टरचे देखील उद्घाटन याप्रसंगी पार पडले. कार्यक्रमाचे नियोजन अविनाश लोखंडे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार खंडोबावाडी जि प. वस्ती शाळेचे मुख्याध्यापक गोरक्षनाथ शिंदे यांनी मानले.

## विहीर अधिग्रहणाची देयके प्रलंबित

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

वैजापूर : वैजापूर पंचायत समिती अंतर्गत विहीर अधिग्रहणाची तब्बल ६० लाख रुपयांची देयके मागील एक वर्षापासुन प्रलंबित असल्याची बाब समोर आली आहे. बिले न मिळाल्याने विहीर मालक अर्थात शेतकऱ्यांना पंचायत समिती कार्यालयात चकरा मारण्याची वेळ आली आहे.

> विहीर अधिग्रहणाचा निधी अद्याप उपलब्ध झालेला नसल्याने शेतकऱ्यांचे बिल प्रलंबित आहे. बजेट प्राप्त होताच तात्काळ देयके अदा करण्यात येतील, अशी माहिती पंचायत समितीच्या पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख संजय राठोड यांनी दिली.

पाणीटंचाईच्या रणरणत्या उन्हात गावांची तहान भागवण्यासाठी शेतकऱ्यांनी आपली विहीर दिली, पाणी दिले पण मोबदला मात्र अजूनही कागदावरच अडकून राहिला आहे. वैजापूर तालुक्यातील ६७ गावांमधील ८१ विहिरींच्या अधिग्रहणासाठी मंजूर असलेले तब्बल ६० लाख रुपये वर्ष उलटूनही शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेले नाहीत. त्यामुळे दररोज पंचायत समितीच्या पायऱ्या झिजवत, 'साहेब, पाणी घेतलं... पैसे कधी देणार ?' असा प्रश्न विचारणारा शेतकरी आज हतबलपणे उभा आहे. नव्या टंचाई आराखड्याची तयारी सुरू असताना, जुनं देणं अजूनही न फेडलेलं असणं ही प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उभी करणारी बाब ठरत आहे.

पंचायत समितीच्या पाणीपुरवठा विभागात केवळ एकाच अधिकाऱ्यावर संपूर्ण तालुक्याची जबाबदारी असल्याने शेतकऱ्यांचे प्रश्न ऐकणारा कोणीच नाही, अशी अवस्था आहे. गेल्या चार वर्षांतील प्रशासकराजात तब्बल ११ प्रशासक बदलले. कारभार कागदावरच राहीला. प्रत्यक्षात मात्र गोंधळच वाढला. आता नवीन गटविकास अधिकारी सुहास वाकचौरे यांनी प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेत कारभाराला शिस्त लावण्यास सुरुवात केली असली, तरी गावांना पाणी देणाऱ्या विहीर अधिग्रहित शेतकऱ्यांचा मोबदला मात्र अजूनही अडकलेलाच आहे. त्यामुळे 'पाणी दिलं, पण न्याय नाही' अशी भावना आज शेतकऱ्यांच्या मनात ठसठसत आहे. निधी मिळत नसल्याने उधारी उसनवारी करावी लागत असल्याचे . एका शेतकऱ्याची व्यथा या शेतकऱ्याने सांगितले.

### रत्नमाला खराडे



**कर्जत** : शहरातील रत्नमाला पंडित खराडे (गुरव) (वय ६८) यांचे बुधवारी (दि.२५) रात्री अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे.

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME SHAKILABANU DAGADU SHAIKH AS PER LEAVING CERTIFICATE TO NEW NAME AS SHAKILA JAHANGIR SAYYAD VIDE AADHAR NO 776759967379 Tal-Rahata, Dist-Ahilyanagar Affidavit No. 2552242041268100658599

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME ABDUL RAJJAK ABDUL MAJID JUNANI (NAME AS PER OLD PASSPORT NO.N025291 ) TO NEW NAME AS RAJJAK A MAJID JUNANI VIDE AADHAR NO.6717 2088 3033

## निंबुत हद्दीत ओढ्यालगत गावठी हातभट्टी दारूचा अड्डा उध्वस्त

वडगाव निंबाळकर पोलिसांची कारवाई.

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोमेश्वरनगर** - बारामती तालुक्यातील वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशन हद्दीतील नींबूत गावच्या हद्दीत ओढ्यालगत मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे प्रमोद प्रकाश नवले राहणार लक्ष्मीनगर निंबुत तालुका बारामती जिल्हा पुणे हा गावठी हातभट्टी दारू तयार करीत असल्याची माहिती मिळाली. त्या माहितीच्या अनुषंगाने सहाय्यक पोलीस निरीक्षक नागनाथ पाटील व इतर स्टाफ सहित रवाना होऊन



सदर ठिकाणी जाऊन पाहणी केली असता, ३ नग लोखंडी बॅरल मध्ये कच्चे रसायन, जमिनीत खड्ड्यामध्ये कच्चे रसायन, दोन नग प्लॅस्टिकच्या टाक्या, २४ नग ३५ लिटल क्षमतेचे हातभट्टी गावठी दारू, चार नग विद्युत मोटर पंप व इतर साहित्य असा एकूण ३ लाख ५९ हजार किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. भारतीय न्याय संहिता व महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. सदरची कारवाई संदीपसिंह गिल्ल, पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण, गणेश बिरादार, अप्पर पोलीस अधीक्षक, बारामती विभाग, सुदर्शन राठोड, उपविभागीय पोलीस अधिकारी, बारामती उपविभाग, अविनाश शिळीमकर, पोलीस निरीक्षक स्थानीक गुन्हे शाखा, पुणे ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली नागनाथ पाटील सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस हवालदार पोपट नाळे, अनिल खेडकर, महिला पोलीस हवालदार शुभांगी दणाने,पोलीस अंमलदार आबा जाधव,नरेंद्र यादव, धनंजय भोसले, विकास येटाळे,महिला पोलिस अंमलदार प्रियंका झणझणे, चालक पोलीस हवालदार विजय शेंडकर यांनी मिळून केली आहे.

## गंगापूर, खुलताबाद तालुक्यात मका खरेदी केंद्रास मुदतवाढ

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर** : गंगापूर, खुलताबाद तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी मका खरेदी केंद्रांना मुदतवाढ व उद्दिष्ट वाढवून देण्यात आली असून अन्न व नागरी पुरवठा मंत्री तसे कार्यवाहीचे निर्देश दिल्याची असल्याची माहिती आ.प्रशांत बंब यांनी दिली आहे. याबाबत आ. प्रशांत बंब यांनी मंत्री छगन भुजबळ यांच्याकडे मका खरेदी केंद्रांना तातडीने मुदतवाढ व उद्दिष्ट वाढवून देण्याची मागणी पत्राद्वरे केली होती. खरीप पणन हंगाम २०२५-२६ मध्ये किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत केंद्रांना मका खरेदीचे उद्दिष्ट देण्यात आले होते.मात्र उद्दिष्ट पूर्ण झाल्यानंतर केंद्रे बंद झाल्याने हजारो नोंदणीकृत शेतकऱ्यांची मका खरेदी अर्धवट राहिली होती. सद्यस्थितीत गंगापूर केंद्र : ११०० शेतकऱ्यांची सुमारे ३४१७२ क्विंटल मका बाकी, लासुर स्टेशन केंद्र : ५४० शेतकऱ्यांची १५४७१.४३ क्विंटल मका बाकी, खुलताबाद केंद्र : ३३४ शेतकऱ्यांची ६००० क्विंटल मका बाकी, बाजारसावंगी केंद्र : ५७० शेतकऱ्यांची ९७९२ क्विंटल मका बाकी अशी एकूण चाररही केंद्रांवर मिळून सुमारे ६५४३५.४३ क्विंटल मका खरेदी करणे बाकी आहे.या सर्व नोंदणीकृत शेतकऱ्यांची आता मका खरेदी केली जाणार आहे.

## उंदिरगावच्या उपसरपंचपदी आलमनूर शेख बिनविरोध

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर**, : तालुक्यातील राजकीयदृष्ट्या महत्वाच्या असणाऱ्या उंदीरगाव ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी आलमनुर अब्बास शेख यांची बिनविरोध निवड करण्यात आली. उंदीरगाव ग्रामपंचायतीमध्ये माजी आ. भानुदास मुरकुटे गटाचे बहुमत असून लोकनियुक्त सरपंच म्हणून प्रतिभा गोलवड या निवडून आल्या आहेत. रोटेशन पद्धतीने प्रत्येक सदस्याला काम करण्याची संधी मिळावी, म्हणून पक्षश्रेष्ठी उपसरपंचपद हे दरवर्षी बदलत असतात. ज्ञानेश्वर बांद्रे यांनी राजीनामा दिल्यानंतर रिक्त झालेल्या उपसरपंचपदी आलमनुर अब्बास शेख यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवडणूक अधिकारी म्हणून ग्रामसेवक आसने यांनी काम पाहिले. यावेळी सरपंच प्रतिभा गोलवड यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. यावेळी अशोक कारखान्याचे माजी चेअरमन सुरेश गलांडे, संचालक विरेश गलांडे यांनी मार्गदर्शन केले. सरपंच व उपसरपंच दोन्ही महिला असल्याने ग्रामपंचायतमध्ये महिलाराज सुरू झाले आहे.

# ''बालसंगोपन'' अनुदानाला विलंब होत असल्याची मंत्र्यांची कबुली

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : गेल्या काही वर्षापासून अनुदान रखडलेल्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेचा विषय विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात ऐरणीवर आला. योजनेच्या अनुदान वाटपास विलंब होत असल्याची कबुलीच सरकारने दिली. विधानपरिषदेत आमदार निरंजन डावखरे, प्रवीण दरेकर, प्रसाद लाड, सदाभाऊ खोत, उमा खापरे, संजय केणेकर यांनी याबाबत तारांकित प्रश्न विचारला होता. त्यावर महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी लेखी उत्तर दिले. ''राज्यातील अनाथ, निराधार, तसेच आई किंवा वडील अथवा दोन्ही गमावलेल्या शून्य ते अठरा वर्षे वयोगटातील बालकांसाठी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना राबविण्यात येत आहे. या लाभार्थी बालकांना दरमहा २ हजार २५० पन्नास रूपये व कोरोनाच्या महासंकटात पालक गमावलेल्या लाभार्थ्यांना केंद्र सरकारच्या पी.एम.केअर फंड योजनेतून दरमहा ४ हजार रू. अनुदान दिले जातात, हे खरे आहे काय?'' असा प्रश्न विचारला होता. त्यावर मंत्री तटकरे यांनी '' होय, असे सांगितले.

या योजनेचा दीड लाख बालके लाभ घेत असून या आर्थिक वर्षात लाभार्थ्यांना आठ महिन्यांपासून तसेच नव्याने प्रस्ताव दाखल केलेल्या लाभार्थ्यांना एक ते दोन वर्षांपासून लाभाची रक्कम मिळाली नाही. उपरोक्त लाभार्थ्यांना द्यावयाच्या रकमेकरीता निधीची तरतूद करण्यात येऊनही अद्याप निधी वितरीत करण्यात आला नाही, हेही खरे आहे का? असल्यास सदर मागण्यांच्या प्रस्तावाबाबत तसेच वंचित बालकांना त्यांच्या शिक्षण शिक्षणासाठी व संगोपनासाठी प्रलंबित असलेला निधी वितरित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे? वा करण्यात येत आहे?, असे प्रश्न सदस्यांनी विचारले होते. त्यावर उत्तर देताना महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी निधी वाटपास विलंब झाल्याची कबुली दिली. राज्यातील अनाथ, निराश्रित, निराधार, बेघर संरक्षण व निवाऱ्याची गरज असलेल्या शून्य ते अठरा वर्षे वयोगटातील मुला-मुलींना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना दरमहा २२५० रू. इतकी मदत दिली जाते. तसेच कोरोनामध्ये पालक गमावलेल्या लाभार्थ्यांना केंद्र सरकारच्या मिशन वात्सल्य योजनेअंतर्गत दरमहा ४ हजार रू. इतकी मदत दिली जाते.

योजनेअंतर्गत बालकांना निधी उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने सन २०२५-२६ मधील अर्थसंकल्पीय तरतूद व पुरवणी मागणीद्वरे आतापर्यंत प्राप्त झालेला निधी वितरीत करण्यात आलेला आहे. तसेच आवश्यक उर्वरित निधीसाठी फेब्रुवारी २०२६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात पुरवणी मागणी सादर करण्यात आली आहे.'', असे मंत्री तटकरे यांनी उत्तरात म्हटले आहे.

## नशिबाची परिक्षा

शुक्रवार दि . २७ फेब्रुवारी २०२६

### मिलनम डे

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १४०<br>२३०<br>७८० | ५-१ | १४६<br>४७०<br>३४४ | जोड<br>५८-०१-२७-६४-१९ |

### कल्याण

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १२५<br>२६०<br>४४० | ८-२ | १५६<br>१२९<br>११० | जोड<br>८६-४२-०१-५३-२९ |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| २९०<br>४९०<br>५६० | १-० | १९०<br>२८०<br>४६० | जोड<br>१३-६०-२७-९५-०८ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 466 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |
| 05/01/2026 to 09/01/2026 | 477 86 178 | 458 73 580 | 355 34 338 | 239 46 259 | 123 67 188 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |

✻ वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये ✻

# पाच कोटींची योजना करूनही पाण्यासाठी आंदोलन, हे दुर्दैव : आ. तनपुरे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**करंजी** : मिरी गावासाठी स्वतंत्र पाणी योजना मंजुर करून पाच कोटी रुपये निधि दिला. त्यानंतर ही मिरी ग्रामस्थांना पाणी मिळावे म्हणुन आंदोलन करण्याची वेळ येते हे दुर्दैवी असुन योजनेतील कथित दिरंगाई, निकृष्ट कामकाज आणि आर्थिक अनियमितता याचा हिशोब द्या आणि तातडीने पाणी पुरवठा सुरळीत करा अशी मागणी करत मिरीत रास्ता रोको आंदोलन केले. या आंदोलनास मिरी ग्रामस्थांनी उत्स्फूर्त पाठिंबा दिला.

यावेळी संतोष शिंदे, भागिनाथ गवळी, डॉ. बबनराव नरसाळे, एकनाथ झाडे, राजू मामा तागड, विजय गवळी, उपस्थित होते. यावेळी बोलताना तनपुरे म्हणाले कि मिरी गावासाठी पिण्याच्या पाण्याची योजना म्हणुन आघाडी सरकारच्या काळात सुमारे साडेचार कोटी रुपयांचा निधी मंजूर होऊन डिसेंबर २०२२ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला. एक वर्षात काम पूर्ण करायचे असताना तब्बल तीन वर्षे उलटूनही योजना पूर्ण का झाली नाही? तसेच काम अपूर्ण असतानाही सुमारे अडीच कोटी रुपयांची बिले कोणत्या निकषांवर अदा करण्यात आली? कोणतेही ठोस व अधिकृत कारण नसताना ठेकेदाराला वारंवार मुदतवाढ का देण्यात आली? तीन वर्षांनंतरही पाणी योजना पूर्ण होत नसेल तर जबाबदार कोण? ग्रामस्थांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न चेष्टा वाटली काय? टँकर व मिरी-तिसगाव योजनेतून होणारा पाणीपुरवठा हा तात्पुरता उपाय आहे.



परंतु एवढा मोठा निधी मंजूर असताना कायमस्वरूपी उपाययोजना का होत नाहीत? संबंधित अधिकारी ठेकेदारांना पाठीशी घालत आहेत का? अशा कठोर शब्दांत तनपुरेंनी अधिकाऱ्यांना चांगलेच फैलावर घेतले. तनपुरेंच्या प्रश्नांवर अधिकारी मात्र निरुत्तर झाल्याचे आंदोलनस्थळी दिसून आले. ठेकेदार कोणत्याही पक्षाचा असो, त्याला काळ्या यादीत टाका व मिरी गावच्या पाणी प्रश्नाबाबत लेखी उत्तर दिल्याशिवाय आम्ही इथून हलणार नाही असा आक्रमक पवित्रा तनपुरे यांनी घेतला व त्यास मिरी ग्रामस्थांनीही मोठी साथ दिली. या आंदोलनात महादेव कुटे, गिरधारी डहाळे, बापू मिरपगार, हरी दाणे आदींनी मनोगते व्यक्त केली.

पोपटराव गवळी, माणिक गवळी, नारायण सोलाट, नामदेव दारकुंडे, बंडू झाडे, नंदराज कुटे, राजू शेख, मच्छिंद्र दारकुंडे, संभाजी दारकुंडे यांच्यासह सर्वपक्षीय नेते व ग्रामस्थ प्रचंड मोठा संख्येने उपस्थित होते. राष्ट्रवादीच्या तनपुरे यांच्या नेतृत्वाखालील या आंदोलनात ग्रामस्थ म्हणून भाजपचे अनेक कार्यकर्ते सहभागी झाल्याने राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरला आहे.

### लेखी आश्वासनानंतर आंदोलन स्थगित

ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता प्रशांत जायभाय यांनी लेखी आश्वासन देत २० दिवसांत गावठाण हद्दीतील टाकी पूर्ण करून पाणीपुरवठा सुरू करण्याचे मान्य केले. उर्वरित तीन टाक्या ३० दिवसांत पूर्ण करण्याची अंतिम मुदत ठेकेदाराला देण्यात आली असून आठ दिवसांत काम सुरू न झाल्यास व मुदतीत पूर्ण न केल्यास ठेकेदारावर कारवाई केली जाईल, असे नमूद करण्यात आले.

### कृत्रिम पाणीटंचाईचा आरोप

भाजपचे मंडळाध्यक्ष तथा माजी सरपंच संतोष शिंदे यांनी ठेकेदार व अधिकाऱ्यांमुळे मिरीत कृत्रिम पाणीटंचाई निर्माण झाल्याचा आरोप केला. प्रमुख ठेकेदाराने स्वतःचा वाटा घेऊन प्रत्यक्ष काम स्थानिक ठेकेदाराकडे दिल्याचे त्यांनी सांगितले.

## द • ख • ल

### आनंदऋषी इन्स्टिट्यूटचा १०० टक्के निकाल





**अहिल्यानगर** : महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई अंतर्गत घेण्यात आलेल्या हिवाळी परीक्षा २०२५-२६ मध्ये आनंदऋषी इन्स्टिट्यूट ऑफ पॅरामेडिकल फायर अँड इंडस्ट्रियल सेफ्टी, अहिल्यानगर या संस्थेने १०० टक्के निकालाची उज्वल कामगिरी नोंदवली आहे. एडीएमएलटी अभ्यासक्रमात शिवानी कानवडे व अनिकेत डोंगरे यांनी प्रथम क्रमांक मिळविला. पूजा बोरसे व गणेश महाजन द्वितीय, तर प्रकाश तुपे तृतीय क्रमांकावर राहिले. एडीआयएसमध्ये अभिषेक कुमार सिंग व सलमान खान प्रथम, नवाज शरीफ व श्रीकृष्ण दांदले द्वितीय, तर मोहम्मद सलीम व मोहम्मद वाशिम तृतीय आले. डिप्लोमा इन फायर इंजिनिअरिंगमध्ये हरिष देशमुख प्रथम, अक्षय चेंगेडीया व पुनम द्वितीय, तर पंकज सोनवणे व सोमनाथ कानगुडे तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले. या यशाबद्दल संचालक प्रा. हिरालाल लुनावत, सचिव अमृता जैन, कोषाध्यक्ष मनोज लुणावत व प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. दरम्यान, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेस प्रारंभ झाला आहे.

### हनुमान विद्यालयाचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश



**टाकळी खातगाव** : राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षा (एन. एम. एम. एस.) मध्ये हनुमान विद्यालयाचे तेरा विद्यार्थी पात्र ठरले आहेत, अशी माहिती प्राचार्य दिलीप बाक्षे यांनी दिली. केंद्र शासनाच्या मानव संशोधन मंत्रालयाच्या वतीने आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी एन.एम.एम.एस. ही परीक्षा घेतली जाते. ही परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना दरवर्षी १२ हजार रूपये शिष्यवृत्ती दिली जाते. बारावीपर्यंत ही शिष्यवृत्ती दिली जाते. तन्वी ठागणे ही विद्यालयात प्रथम आली. सार्थक बांदल ही द्वितीय तर अंकिता सातपुते ही तृतीय आली. प्रतिक्षा कळमकर, दिव्या जाधव, स्वरा कर्डिले, सार्थक तागड, श्रेया घोलप, मानस कोरडे, आर्य शिंदे, सौरभ बांदल, समर्थ कुलट, ज्ञानेश्वरी जाधव हे शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत.

### अहमदनगर जिल्हा मित्र मंडळ, पुणे ट्रस्टचे नामांतरास मंजुरी



**लिंपणगाव** : अहमदनगर जिल्हा मित्र मंडळ, पुणे ही धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे नोंदणीकृत विश्वस्त संस्था असून तिची स्थापना सन १९९३ मध्ये करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या ८ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या अधिसूचनेनुसार अहमदनगर जिल्ह्याचे नाव बदलून अहिल्यानगर करण्यात आले आहे. त्यानुसार संस्थेचे नावही बदलून अहिल्यानगर जिल्हा मित्र मंडळ, पुणे असे करण्यात यावे, असा ठराव मागील वार्षिक सर्वसाधारण सभेत संमत करण्यात आला होता. सदर ठराव काल झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत कायम करण्यात आल्याची माहिती अध्यक्ष साहेबराव खामकर यांनी दिली. संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती मार्गदर्शक विश्वस्त भास्कर शेळके यांनी दिली. तसेच नजीकच्या काळात एक सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असून मोफत फिजिओथेरपी शिबिरही राबविण्यात येणार असल्याचे कोषाध्यक्ष साहेबराव मोरे यांनी सांगितले.

### चिचोंडी पाटीलचे सरपंच शरद पवार यांना 'आदर्श सरपंच' पुरस्कार

**अहिल्यानगर** : निलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने पारनेर येथे आयोजित राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनात चिचोंडी पाटील (ता. नगर) ग्रामपंचायतीचे सरपंच शरदभाऊ खंडेराव पवार यांना 'आदर्श सरपंच' पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार खासदार निलेश लंके व मान्यवरांच्या हस्ते देण्यात आला. दोन पंचवार्षिक कालावधीत सरपंच व उपसरपंच म्हणून काम करताना पवार यांनी गावाचा सर्वांगीण विकास साधल्याचे नमूद करण्यात आले. गावात रस्ते, पाणीपुरवठा व वीज या मूलभूत सुविधांबरोबरच आरोग्य, कृषी, वन व महसूल विभागाच्या विविध योजनांचा लाभ थेट नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात त्यांनी पुढाकार घेतला. गावात १५ मेगावॅट सौर प्रकल्प उभारून शेतकऱ्यांना दिवसभर शेतीपंपासाठी अखंडित वीज उपलब्ध करून देण्यात आली. तंटामुक्ती उपक्रमातून अनेक वाद गावपातळीवर सोडविण्यात आले. तसेच स्वखर्चातून म्बुलन्स, स्वर्गरथ, विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत आदी उपक्रम राबविण्यात आले. पुरस्काराबद्दल प्रतिक्रिया देताना पवार यांनी प्रतिष्ठानचे आभार मानत गावाच्या विकासासाठी आणखी जोमाने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

## 'कडी-कोयंडा' तोडून घरफोडी; एकाच गावात दोन घटना

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : शांत, कष्टकरी मुंढेकरवाडीला चोरट्यांनी लक्ष्य केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. कडी-कोयंडा फोडून घरात शिरत अज्ञात चोरट्यांनी १ लाख ३० हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. मजुरी करून संसार सांभाळणाऱ्या महिलेवर हा मोठा आर्थिक आघात ठरला आहे. श्रीगोंदा तालुक्यातील मुंढेकरवाडी या ठिकाणी मोलमजुरी करून उपजीविका भागवणाऱ्या एका महिलेचा घरात.

२४ फेब्रुवारी सकाळी १० ते दि. २५ फेब्रुवारी सकाळी ८.३० च्या दरम्यान, फिर्यादी रंजना बाळु कणसे (वय ५७, व्यवसाय - मजुरी, रा. मुंढेकरवाडी, ता. श्रीगोंदा)कामानिमित्त बाहेर असताना अज्ञात चोरट्या कडून घरावर डल्ला मारण्यात आला. त्यांनी घरातून लोखंडी पेटीची उचकापाचक करून सुमारे ३०,००० किंमतीचा १० ग्रॅम सोन्याचा नेकलेस,सुमारे ३०,००० किंमतीचे १० ग्रॅम सोन्याचे गंठण (काळ्या-पिवळ्या मण्यांसह),७०,००० रोख रक्कम (५०० व २०० च्या नोटा)तसेच ,एफडी बँकेच्या कागदपत्रांचा संच असा एकूण अंदाजे १,३०,००० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला आहे या प्रकरणी श्रीगोंदा पोलीस स्टेशनमध्ये गु.रजि. नं. भा.न्या.सं. कलम ३३१(४), ३०५(-) प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोहेकॉ अविनाश काटकर करीत असून प्रभारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

दिवसाढवळ्या घरफोडी, त्यात दोन घरांचा उल्लेख म्हणजे रेकी करूनच वार झाला का? गावकऱ्यांनी आता स्वतःची सुरक्षा वाढवण्याची गरज व्यक्त केली आहे.चोरटे स्मार्ट, पण कायदा त्याहून स्मार्ट असला पाहिजे.आता नजरा तपासाच्या पुढील पावलांवर आहेत. गावातील किरण नामदेव मुंढेकर यांच्या घरातूनही सोन्याचे दागिने चोरीला गेल्याची माहिती समोर आली आहे. म्हणजेच हा 'सिंगल ऑपरेशन' की टोळीचा खेळ? गावात चर्चा रंगली आहे.

## पीएमश्री जि प प्राथ. शाळा पिसोरे खांडचे जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धेत यश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**लिंपणगाव** : जिल्हा परिषद अहिल्यानगर प्राथमिक शिक्षण विभाग यांच्या वतीने त्रिमूर्ती शैक्षणिक संकुल, नेवासा येथे नुकत्याच संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धेत पी.एम.श्री. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिसोरे खांड येथील बाल खो-खो पटूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत तृतीय क्रमांक पटकावला. १४ वर्ष वयोगटातील मुले आणि मुली या दोन्ही संघांनी तालुकास्तरावर प्रथम क्रमांक मिळवत जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली होती. जिल्हास्तरीय स्पर्धेत जिल्ह्यातील एकूण १६ संघांनी सहभाग नोंदवला.

नियमित व शिस्तबद्ध सराव आणि नियमांची अचूक जाण या बळावर मुलांच्या संघाने संगमनेर व कोपरगाव संघावर विजय मिळवला, तर मुलींच्या संघाने जामखेड व अकोले संघाला पराभूत करत आपली ताकद सिद्ध केली. या विजयी संघांना क्रीडाशिक्षक आकाश महाडिक यांच्यासह मुख्याध्यापक श्री. हातवळणे सर व शाळेतील सर्व शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

पिसोरेखांडसारख्या ग्रामीण भागातील शाळेने मिळविलेल्या या दैदिप्यमान यशाबद्दल सरपंच, उपसरपंच, चेअरमन, व्हा. चेअरमन, शाळा व्यवस्थापन समिती तसेच ग्रामस्थांनी संघाचे अभिनंदन करून कौतुक केले आहे.

## शहरटाकळी विद्यालयातील वस्तीगृहात रगींचे वाटप



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शहरटाकळी** : वस्त्रदान हे श्रेष्ठ दानांपैकी एक मानले जाते. गरजू व्यक्तींना कपडे देणे म्हणजे केवळ त्यांच्या शरीराचे संरक्षण नव्हे, तर त्यांच्या जीवनात सन्मान, आत्मविश्वास आणि सामाजिक आपलेपणाची भावना निर्माण करणे होय. थंडीच्या दिवसांत उबदार कपड्यांचे महत्त्व अधिक वाढते आणि अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच समाजातील सहकार्य, दयाभाव आणि मानवतेचे मूल्य समजते, तसेच समाजातील सक्षम घटकांनी अशा सामाजिक कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन विद्यालयाचे प्राचार्य सुनिल जायभाये यांनी केले. कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे शहरटाकळी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील संत गाडगेबाबा छात्रालयात वस्तीगृहातील २४ विद्यार्थ्यांना उबदार रगींचे वाटप करण्यात आले.त्याप्रसंगी ते बोलत होते. ढोरसडे ता.शेवगाव येथील हरिभाऊ विखे व सौ. मंगल विखे यांच्या लग्न वाढदिवसानिमित्त व यांची कन्या पूजा विखे यांच्या विवाहानिमित्त वस्तीगृहातील २४ विद्यार्थ्यांना उबदार रगींचे वाटप करण्यात आले.

## शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शिक्षक, मुख्याध्यापक पदोन्नतीचा मार्ग मोकळा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : राज्यातील हजारो शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी शालेय शिक्षण विभागाने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे शिक्षकेतर कर्मचारी पात्रता पूर्ण करून शिक्षक किंवा मुख्याध्यापक पदावर नियुक्त होऊ शकतील. विशेष म्हणजे, अशा कर्मचाऱ्यांना पुन्हा शिक्षण सेवकांचा कालावधी पूर्ण करण्याची सक्ती नसणार आहे. यामुळे अनेकांना न्यायालयीन लढाई किंवा पदोन्नती नाकारण्याच्या समस्येतून मुक्ती मिळणार आहे. हा निर्णय नियमित शासकीय सेवेतील किंवा अनुदानित सेवेतील कर्मचाऱ्यांना लागू होईल, ज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा आणि १०० टक्के अनुदानित शाळांचा समावेश आहे. शालेय शिक्षण विभागाने जारी केलेल्या या निर्णयाची अंमलबजावणी जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांमार्फत होणार आहे. याचा फायदा प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा तसेच अध्यापक विद्यालये, शासकीय विद्यानिकेतने आणि सैनिकी शाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मिळेल. पूर्वी १० जून २००५ च्या शासन निर्णयानुसार अशा कर्मचाऱ्यांना शिक्षक पदावर पदोन्नती घेताना शिक्षण सेवक योजना अनिवार्य होती, ज्यामुळे अनेकजण पदोन्नती घेण्यास टाळाटाळ करीत होते किंवा न्यायालयात जात होते. आता या निर्णयाने त्यांची आहे तीच वेतननिश्चिती कायम राहणार असल्याने, ते शिक्षक किंवा मुख्याध्यापक पदावर सहज संक्रमण करू शकतील. महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेतर संघटनांचे महामंडळाचे सेक्रेटरी शिवाजी खांडेकर यांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. ते म्हणाले, हा निर्णय शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी ऐतिहासिक आहे. पूर्वीच्या निर्णयामुळे अनेकांना अंतिम वेतनश्रेणी गमवावी लागत होती, पण आता ते नवीन वेतनश्रेणीत समाविष्ट होऊ शकतील.

## छत्रपती महाविद्यालयास तीन राज्यस्तरीय पुरस्कार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव** : महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्राद्वारे श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयास सन २०२५-२६ करता करिअर कट्टा उपक्रमास राज्यस्तरीय तीन राज्यस्तरीय पुरस्काराचे वितरण मुंबई आणि पुणे येथे संपन्न झाले. पहिला पुरस्कार मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे दि. २५ फेब्रुवारी २०२६ रोजी पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण केंद्रातील विशेष कामगिरी बद्दल डॉ.सतीशचंद्र सुर्यवंशी यांना राज्यस्तरीय पुरस्कार उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीमध्ये व खादी व ग्रामोद्योग राज्यमंत्री रवींद्र साठे यांच्या हस्ते वितरित झाला.



तसेच दिनांक २६ फेब्रुवारी २०२६ रोजी हरिभाई देसाई कॉलेज, पुणे येथे अतिरिक्त जिल्हाधिकारी राजीव नंदकर यांच्या हस्ते उत्कृष्ट महाविद्यालयीन समन्वयक म्हणून डॉ.विलास सुद्रिक आणि छत्रपती महाविद्यालयास उत्कृष्ट महाविद्यालयीन विद्यार्थी करिअर संसद म्हणून पुरस्कार वितरित झाला. सदर पुरस्कार करता समन्वयक डॉ.विजय इथापे, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. सतीश चोरमले व प्रा.वैभव सोनवणे उपस्थित होते.

स्व.शिवाजीराव नागवडे यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे या उद्देशाने १९८२ साली महाविद्यालय सुरू केले. त्यांनी प्रतिकूल परिस्थितीत संस्थेच्या गुणात्मक प्रगतीसाठी अथक परिश्रम घेतले. ९९ विद्यार्थी संख्येवर सुरू झालेले महाविद्यालय, आज ४००० दरम्यान विदयार्थी अध्यापन करत आहे. १६ एकर भौतिक सुविधा असलेला सुंदर परिसर आहे. संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र (दादा) नागवडे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाची उत्तम प्रगती सुरू आहे.'नॅक'मध्ये मिळविलेले ए प्लस मानांकन आणि पुरस्कारांची हॅट्रिक होणे त्याचे द्योतक आहे.

छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे यांनी शुभेच्छा देत, प्राध्यापक व विद्यार्थी कष्टातून उत्तम प्रावीण्य मिळवत आहेत. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाबरोबर शारीरिक विकासाला प्राधान्य दिले जाते. परिणामी उच्चतम निकाल व आधुनिक तंत्रज्ञानचा वापर यामुळे महाविद्यालय नावारूपाला आले असल्याची प्रतिक्रिया दिली या यशाबद्दल पुरस्कार प्राप्त सर्वांचे कौतुक करून संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे, उपाध्यक्ष मेघाताई औटी, जिल्हा बँक संचालिका अनुराधाताई नागवडे, सर्व विश्वस्त व निरीक्षक सचिन लगड, अध्यापक व अध्यापकेतर सेवकांनी अभिनंदन केले.

## वाघोलीत शेतरस्त्यांचे तालुकास्तरीय मॉडेल उभारण्यास सुरुवात

### तहसीलदारांची प्रत्यक्ष पाहणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव** : अहिल्यानगर जिल्ह्यात ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी दिलासादायक ठरणारा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून शिव रस्ते व पादन रस्ते यांची अधिकृत हद्द खूना करून ते पक्के करण्याचा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाचे संकल्पक जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी जिल्हाभरात तत्काळ अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले आहेत. शेतकऱ्यांना त्यांच्या शेतापर्यंत वर्षभर सुलभ वाहतूक सुविधा उपलब्ध व्हावी, शेतीमालाची ने-आण सोपी व्हावी तसेच रस्त्यांच्या हद्दींबाबत उद्भवणारे वाद कायमस्वरूपी निकाली निघावेत, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.



हद्द निश्चितीमुळे अनधिकृत अतिक्रमणांवरही आळा बसणार असून ग्रामविकासाला गती मिळणार आहे. या पार्श्वभूमीवर शेवगाव तालुक्यातील वाघोली गावात शेतरस्त्यांचे आदर्श मॉडेल उभे करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार तहसीलदार आकाश दहाडदे यांनी गावाला भेट देऊन प्रत्यक्ष रस्त्यांची पाहणी केली. यावेळी महसूल विभागाचे कर्मचारी, ग्रामपंचायत पदाधिकारी व स्थानिक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पाहणी दरम्यान रस्त्यांची मोजणी, हद्द खूना, अडथळे दूर करणे व पुढील कामकाजाबाबत आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या. लवकरच प्रत्यक्ष कामांना वेग देऊन वाघोली गावात शाश्वत व दर्जेदार शेतरस्ते उभारले जाणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले असल्याचे उमेश भालसिंग यांनी सांगितले. या अभिनव उपक्रमामुळे शेतकऱ्यांच्या दैनंदिन शेतीकामात सुलभता येणार असून तालुक्यातील इतर गावांसाठी वाघोली हे मार्गदर्शक मॉडेल ठरणार आहे.

## अत्याचाराच्या घटनेतील आरोपी जेरबंद



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कर्जत** : मागील एका महिन्यापासून अत्याचाराच्या घटनेत फरार असलेल्या आरोपीस कर्जत पोलिसांनी जेरबंद करण्यात यश मिळवले. केशव कचरू लोंढे (धानोरा-फक्राबाद ता. जामखेड) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पोस्को गुन्ह्यातील अत्याचार करून फरार असलेल्या आरोपी केशव लोंढे हा २७ जानेवारीपासून फरार होता. कर्जत पोलीस त्याच्या मागावर असताना पोलीस निरीक्षक सोपान शिरसाट यांना सदरील आरोपी त्याच्या घरी येणार असल्याची माहिती मिळाली. यावेळी कर्जत पोलिसांनी जामखेड पोलिसांच्या मदतीने केशव लोंढेच्या घराशेजारी सापळा लावला असता तो घरी येताच त्यास जेरबंद करण्यात यश मिळाले. पोलीस उपअधीक्षक प्रवीण लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक प्रदीप बोऱ्हाडे, पोलीस कर्मचारी राजेंद्र थोरात, अनिता निकत, दीपक कोल्हे, जालिंदर माळशिकारे, वैभव गांगर्डे, राणी पुरी यांच्यासह जामखेडचे भागीरथ देशमाने या पथकाने सदरची कार्यवाही यशस्वी पार पाडली.


### जाहीर नोटीस

प्रो.फी.जमा रु
प्रो.पा.न
ने.ता. २७/०३/२०२६

के.बी.शेख
ॲडव्होकेट श्रीरामपूर
ता.२६/०२/२०२६

श्रीरामपूर येथील मे सिव्हिल जज्ज साहेब सी.डी. यांचे कोर्टात

वा.चौ.अ.नंबर ११/२०२६
नि.६

श्री.अशोक चांगदेव लोखंडे, वय ६७ वर्षे, धंदा शेती व व्यापार
रा.श्रीरामपूर वार्ड नंबर ६, कामगार हॉस्पिटल, जवळ ता.श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर-**अर्जदार**
विरुद्ध
१.अंजली रंजीत सिनारे, वय ४५ वर्षे, धंदा-गृहिणी, रा.इंदिरानगर ता.श्रीरामपूर जि. अहिल्यानगर,
२.सौ. रेखा भगवान महाजन, वय ५४ वर्षे, धंदा-गृहिणी, रा.मोतीबाग नावा, रतनलाल लस्सीवाले समोर मु. पो. मालेगाव, जि.नाशिक
३. रोहिणी रमेश निनाळ, वय ५०वर्षे, धंदा-गृहिणी, रा. स्मशानभूमी जवळ, भिंगार ता.जि.अहिल्यानगर
४. सुरेखा भाऊसाहेब थेटे, वय ४५ वर्षे, धंदा-गृहिणी
५. जयंत भाऊसाहेब थेटे, वय २५ वर्षे, धंदा-व्यापार, नंबर ४ व ५ रा, वार्ड.नंबर ७ मोरगे वस्ती, गणपती रोड, श्रीरामपूर ता.श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर - **सा वले**

अर्ज - बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ३ व ५८ अन्वये वारंत चौकशी अर्ज नंबर ५१/२०२४ मध्ये दिलेले वाद प्रमाणपत्र रिओकेशन होऊन रद्द होण्यासाठी

ज्या अर्थी अर्जदाराची जन्मदाती आई शेवंताबाई थेटे या दिनांक २४/१०/२०२३ रोजी श्रीरामपूर येथे अर्जदाराचे राहते घरी मयत झाल्या मयत शेवंताबाई थेटे यांचा प्रथम विवाह हिंदू धर्म शास्त्र व रीती रिवाजा नुसार रामपूर येथील मयत चांगदेव रेणू लोखंडे यांच्याशी झालेला होता मयत चांगदेव लोखंडे हे अर्जदाराचे जनक पिता होते मयत शेवंताबाई व चांगदेव लोखंडे यांनी अर्जदाराचे जन्मानंतर घटस्फोट घेतला त्यानंतर मयात शेवंताबाई यांनी कारभारी धोंडू थेटे यांच्याशी दुसरा विवाह केला कारभारी थेटे सुद्धा मयत आहेत मयत शेवंताबाई व कारभारी थेटे यांना सहा वाला नंबर १ ते ३ व मयत भाऊसाहेब अशी अपत्य जन्मलेली आहेत सा वाले नंबर ४ ही मयत भाऊसाहेब ची पत्नी आहे व सावाला नंबर ५ हा मयत भाऊसाहेब व सावली नंबर ४ यांचे विवाह संबंधातून जन्मलेला मुलगा आहे स वाले नंबर ४ व ५ आई व मुलगा असून ते दोन्हीही एकत्रीत राहतात.

शेवंताबाई थेटे यांचे विवाहपूर्वीचे नाव शेवंताबाई बाप माधव दुधाळ असे होते. त्यांचे माहेर बेलापूर बु होते शेवंताबाई यांचे कडील माधव धोंडीबा दुधाळ यांचे नाव वरील शेती महामंडळाकडील जमीन त्याचा मुलगा हरिभाऊ दुधाळ यांना मिळालेली आहे ते मयत आहेत सा वाला नंबर १ यांनी श्रीरामपूर येथील मी सिविल जज साहेब सीडी यांचे कोर्टात वाचन ५१/२४ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट अन्वये वारस दाखला मिळण्यासाठी दाखल केला त्या अर्जामध्ये सावाले नंबर २ व ३ व अर्जदार एवढेच शेवंताबाई चे वारस आहेत असे दर्शविले व वास्तविक अर्जदार व मयत भाऊसाहेब हे सुद्धा शेवंता बाईचे मुले आहेत व मयत भाऊसाहेब यांना सहा वाले नंबर ४ व ५ हे वारस आहेत ही बाब अर्जदार व सहावाले यांना माहीत असतानाही त्यांनी सदर वासाची माहिती मे कोर्टापासून लपवून ठेवली व शेवंताबाई चे माहेरचे पूर्ण नाव शेवंताबाई बापू माधव दुधाळ असे असतानाही बाबही मे कोर्टापासून लपून ठेवली व शेती महामंडळाकडे जमिनीसमयत शेवंताबाई चे वारस म्हणून नोंद करण्यासाठी खोटे वारस प्रमाणपत्र मिळविले आहे. ते मुळे वाचौअ नंबर ५१/२४ मध्ये दिनांक २७/२/२०२५ रोजी केलेला आदेश रद्द होण्यासाठी वाचौअन ५१/२०२४ रिओकेशन होऊन मिळण्यासाठी सादर वारस प्रमाणपत्र रद्द होऊन मिळण्यासाठी सदरचा अर्ज आहे. त्या अर्थी सदर अर्जाचे अनुषंगाने कोणाची हरकत असल्यास त्यांनी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आज स्वतः आगर माहिती गार वकील साहेबांमार्फत योग्य त्या पुराव्यानिशी या मे कोर्टात हजर होऊन आपली हरकत नोंदवावी अन्यथा अर्जदाराचा लागलीच पुरावा घेण्यात येऊन त्याचे मागील प्रमाणपत्र अर्ज मंजुरी बाबत आदेश पारित केला जाईल.

आज रोजी दिनांक २६/२/२०२६ माझे सही निशी व मे कोर्टाचे शिक्क्यानिशी दिले असे

शिक्का

**कामगिरी क्लर्क**
**दिवाणी न्यायालय व स्तर श्रीरामपूर**

**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय व स्थळ श्रीरामपूर**

# ढापे गळतीमुळे हजारो लिटर पाणी वाया

## घोडनदी बंधाऱ्याची दुरावस्था ; दुरुस्ती न झाल्यास पाणीटंचाईचे सावट

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**कवठे येमाई :** - शिरूर तालुक्यातील टाकळी हाजी–निमगाव दुडे परिसरातील घोडनदीवरील बंधाऱ्यात पाणी अडविण्यासाठी बसविण्यात आलेल्या ढाप्यातून दररोज हजारो लिटर पाणी वाया जात आहे. उन्हाळ्याच्या तोंडावर बंधाऱ्यात नदीतील पाणी पूर्ण दादाने अडवणे अत्यावश्यक असताना या बंधाऱ्यातून मोठ्या प्रमाणात गळती सुरू असल्याने परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांनी तीव्र चिंता व्यक्त केली आहे.स्थानिक नागरिकांच्या माहितीनुसार, बंधाऱ्याचे ढापे काही दिवसांपासून लिकेज असून पाणी थेट खाली वाहून जात आहे. परिणामी बंधाऱ्यात अपेक्षित प्रमाणात पाणी साठत नसल्याचे चित्र दिसून येत आहे. या भागातील बहुतांश शेती ही घोडनदीच्या पाण्यावर अवलंबून असल्याने पाणीसाठा कमी राहिला तर आगामी काळात पाणी टंचाईचा गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांनी सांगितले की,मागील



काही वर्षांपासून पावसाचे प्रमाण अनियमित होत चालले आहे. त्यामुळे बंधाऱ्यातील साठवलेले पाणीच खरी जीवनरेखा ठरत आहे. मात्र सध्या ढापे गळतीमुळे पाणी साठत नसल्याने चालू व उन्हाळी हंगामावर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. पाण्याचा अपव्यय सुरूच राहिला तर विहिरी व बोअरवेल वर ताण वाढून पिण्याच्या पाण्याचाही मोठा प्रश्न निर्माण होऊ शकतो. संबंधित सिंचन विभागाच्या अधिकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन पाहणी करावी, निकृष्ट किंवा खराब झालेल्या ढाप्यांची त्वरित दुरुस्ती किंवा बदल करावा आणि बंधाऱ्याची सुरक्षितता तपासावी अशी मागणी ,स्थानिक शेतकरी व नागरिकांनी केली आहे. प्रशासनाने वेळेत कारवाई न केल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही काही ग्रामस्थांनी दिला आहे.ग्रामीण भागात पाण्याचे व्यवस्थापन हे अत्यंत संवेदनशील विषय मानला जातो. शासन स्तरावर जलसंधारण, पाणी बचत व सिंचन सुविधा वाढवण्यावर भर दिला जात असताना प्रत्यक्षात बंधाऱ्यांची देखभाल व दुरुस्ती वेळेत न झाल्यास योजनांचा उद्देश च अपूर्ण राहतो. त्यामुळे संबंधित यंत्रणांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे मत जाणकारांनी व्यक्त केले आहे.

---

द • ख • ल

## मुलीच्या छेडछाड प्रकरणी सविंदणे हायस्कुल मधील शिक्षकावर गुन्हा

**कवठे येमाई :** - शिरूर तालुक्यातील सविंदणे येथील श्री गुरुदेव दत्त विद्यालयातील विद्यार्थ्यांची सहल सातारा जिल्ह्यातील पाचगणी,महाबळेश्वर परिसरात गेलेली असताना इच्छा नसताना देखील इयत्ता पाचवीतील एका अकरा वर्षीय बालिकेस जबरदस्तीने हॉर्स रायडिंग करण्यासाठी भाग पाडलेल्या व मुलीच्या मनास लज्जा निर्माण होईल अशा पद्धतीने मुलीची छेडछाड करणाऱ्या विद्यालयातील शिक्षक आरोपी नितीन अशोक चव्हाण यांच्या विरोधात बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम १२ व ८ व भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ७४ नुसार शिरूर पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणी मुलीच्या आईने शिरूर पोलिसांत रीतसर तक्रार/फिर्याद दाखल केली असून गुन्हा पाचगणी जि.सातारा पोलिसांकडे कालच वर्ग करण्यात आल्याची माहिती शिरूरचे पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांनी दिली.

दरम्यान सविंदणे येथील याच शिक्षकास टोळक्याने भर चौकात बेदम मारहाण केल्या प्रकरणी निषेध म्हणून सविंदणे गाव बंद ठेवण्यात आले होते.शालेय विद्यार्थ्यांनी शिक्षकास झालेल्या मारहाणीच्या घटनेचा निषेध व्यक्त करीत सरांना न्याय मिळालाच पाहिजे,आरोपींवर कठोर कारवाई झालीच पाहिजे अशा जोरदार घोषणा दिल्या होत्या. घटनेचे गांभीर्य पाहून शिरूर पोलिसांनी सविंदणे येथे मोठा बंदोबस्त ठेवला होता.सुमारे चार तास चाललेल्या आंदोलकांना सखोल चौकशी करण्याचे आश्वासन पोलिसांनी दिल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले. दरम्यान सविंदणे येथील चव्हाण या शिक्षकाला झालेल्या मारहाण प्रकरणी १२ जणांविरोधात शिरूर पोलिसांत रात्री उशिरा गुन्हा दाखल झाला असून घटनेचा पुढील तपास शिरूर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक दिलीप पवार हे करीत आहेत.

## फिरोदिया करंडक स्पर्धेत श्रेया सोमवंशी दुहेरी विजेती



**पुणे :** एस. पी. कॉलेज, पुणे येथे २१ व २२ फेब्रुवारी रोजी पार पडलेल्या महाराष्ट्रातील मानाच्या 'फिरोदिया करंडक' आंतर–महाविद्यालयीन विविध गुणदर्शन स्पर्धा २०२६ मध्ये एम.आय.टी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणेच्या विद्यार्थिनी कुमारी श्रेया योगेश सोमवंशी हिने दुहेरी यश संपादन केले.

१९७४ पासून सुरू असलेल्या या स्पर्धेचे यंदा ५२ वे वर्ष होते. पेंटिंगच्या पिक्सल आर्ट प्रकारात श्रेयाने प्रथम क्रमांक पटकावला. तसेच चित्रकथी प्रकारात पार्थ जोशी यांच्यासह तिने प्रथम पारितोषिक मिळवले.

पिक्सल आर्ट प्रकारात द्वितीय क्रमांक अबोली चव्हाण (पुणे विद्यार्थी गृह अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय) हिला मिळाला, तर तृतीय क्रमांक अनुष्का खेवले व धनश्री भिरुड (झील अभियांत्रिकी आणि संशोधन महाविद्यालय) यांना विभागून देण्यात आला.

प्रतिक्रिया देताना श्रेयाने हे यश महाविद्यालयीन प्राध्यापक, आई–वडील आणि मित्र–मैत्रिणींच्या प्रोत्साहनाला समर्पित असल्याचे सांगितले. लहानपणापासूनच पेंटिंगची आवड असल्याचेही तिने नमूद केले.

अहिल्यानगर जिल्ह्यातील राहाता तालुक्यातील कोल्हार येथील मूळ रहिवासी असलेल्या श्रेयाच्या या यशामुळे परिसरात अभिमान व्यक्त केला जात आहे.

---

# माहूर विद्यालयात सौरऊर्जा प्रकल्पाचे लोकार्पण उत्साहात




प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**नाझरे सुपे :** पुरंदर, ( पुणे) येथील माहूर माध्यमिक विद्यालयात २४ फेब्रुवारी रोजी सौरऊर्जा प्रकल्पाचे लोकार्पण उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. स्नेहांकूर द रे ऑफ होप व रिम्यूनन्स सर्व्हीसेस प्रा. लि. यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. मुख्याध्यापक हनुमंत पवार यांनी प्रास्ताविकात सौरऊर्जा प्रकल्पाची संकल्पना व उद्दिष्टे स्पष्ट केली. विद्यालयाच्या इमारतीवर बसविण्यात आलेल्या सौर पॅनेलमुळे वीज निर्मिती होऊन खर्चात बचत होणार असून बचत झालेला निधी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सुविधांसाठी वापरण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

संस्थेच्या अध्यक्षा ॲड. वृषाली दातार यांनी सौरऊर्जा प्रणालीची तांत्रिक माहिती सादर करत अक्षय ऊर्जेचा स्वीकार ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले. त्यांच्या हस्ते प्रकल्पाचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी जयप्रकाश दातार, अभिजित दातार व श्रीराम फडके उपस्थित होते.

कार्यक्रमास विद्यालयातील शिक्षक इंद्रभान पठारे, विकास राऊत, स्नेहलता टिळेकर, लता गायकवाड, रामचंद्र जगताप, मंगल जगताप, श्रीकांत खोमणे, श्रीकांत गव्हाणे, रामभाऊ कुंभार तसेच सर्व विद्यार्थी उपस्थित होते. संस्था समन्वयक व पुणे जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष रामप्रभू पेटकर यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

विद्यार्थ्यांनी पर्यावरण संरक्षणावरील घोषवाक्ये सादर करून कार्यक्रमात उत्साह निर्माण केला. सूत्रसंचालन महेंद्र भोसले यांनी केले. आभार रामप्रभू पेटकर यांनी मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

---

## शिरूरमधील शेतकऱ्यांची बारामती कृषी केंद्रात अभ्यास सहल

### विविध तंत्रज्ञानाची घेतली माहिती

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**पाबळ :** शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञानाची प्रत्यक्ष माहिती मिळावी, शेतीतील नवे प्रयोग पाहता यावेत तसेच उत्पादन खर्च कमी करून उत्पन्न वाढविण्यासाठी उपयुक्त तंत्रांचा अवलंब करता यावा, या उद्देशाने बारामती येथील कृषी विज्ञान केंद्रात शेतकऱ्यांची अभ्यास सहल आयोजित केली होती. केंद्रित ग्रामीण विकास प्रकल्पांतर्गत शिरूर तालुक्यातील शेतकऱ्यांची सहल आयोजित करण्यात आली. या अभ्यास सहलीस मिडगुलवाडी, कोंढापुरी, केंदूर येथील ५० शेतकरी सहभागी झाले होते.



एचडीएफसी बँक सीएसआर निधीतून सुरू असलेल्या व बायफ संस्थेच्या विद्यमाने राबवण्यात येत असलेल्या कृषी विज्ञान केंद्र, बारामती हे राज्यातील एक अग्रगण्य संशोधन व प्रशिक्षण केंद्र असून येथे शेती, पशुपालन व कृषीपूरक व्यवसायाबाबत विविध संशोधन, प्रात्यक्षिके व प्रशिक्षण उपक्रम राबवले जातात. अभ्यास सहलीदरम्यान शेतकऱ्यांना सुधारित पीक वाणांचे प्रात्यक्षिक प्लॉट, पहक व्यवस्थापनाच्या आधुनिक पद्धती,, अळ आधारित शेती (अऔंळषळलळरश्र खपींशश्रश्रळसशपलश ळप रसॲळर्लीश्रींॲश), ड्रोन तंत्रज्ञान,माती परीक्षणाचे महत्त्व, संतुलित खत व्यवस्थापन, कीड व रोग नियंत्रणाचे शास्त्रीय उपाय, तसेच ठिबक व तुषार सिंचनासारख्या सूक्ष्म सिंचन पद्धतींची माहिती देण्यात आली. तसेच भाजीपाला व फळपीक लागवड, हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर शेतीत करण्याच्या उपाययोजना, जलसंधारणावर आधारित शेती पद्धती, तसेच शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी उपयुक्त कृषीपूरक व्यवसाय याबाबत कृषी विज्ञान केंद्रातील तज्ज्ञांनी सविस्तर मार्गदर्शन केले. प्रत्यक्ष पाहून, अनुभवातून व तज्ज्ञांशी संवाद साधून मिळालेल्या माहितीतून शेतकऱ्यांना नवे तंत्रज्ञान आत्मसात करण्याची प्रेरणा मिळाली.शेतकऱ्यांची जागरूकता वाढली, माहिती घेतली अभ्यास सहलीमुळे सहभागी शेतकऱ्यांमध्ये आधुनिक शेतीविषयक जागरूकता वाढली असून, मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग आपल्या शेतात प्रत्यक्ष राबवण्याचा निर्धार शेतकऱ्यांनी व्यक्त केला. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी अशा प्रकारच्या अभ्यास सहली अत्यंत उपयुक्त ठरत असून, भविष्यातही अशा उपक्रमांची गरज असल्याचे मत उपस्थित शेतकऱ्यांनी व्यक्त केले.

---

# एनएमएमएस परीक्षेत वनपुरीच्या श्री भैरवनाथ विद्यालयाचे घवघवीत यश

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**माळशिरस :**राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटकांसाठी आयोजित करण्यात येणाऱ्या नॅशनल मीन्स कम मेरिट स्कॉलरशिप (छचचड) परीक्षेत पुरंदर शिक्षण प्रसारक मंडळाच्या वनपुरी येथील श्री भैरवनाथ विद्यालयाने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यालयातील तब्बल सहा विद्यार्थी या स्पर्धात्मक परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत. याबद्दल संपूर्ण पंचक्रोशीतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



वनपुरी येथील स्पर्धा परीक्षेतील यशस्वी विद्यार्थी आणि शिक्षक

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे नाव आणि गुण पुढीलप्रमाणे – ईश्वरी संतोष कुंभारकर (८८ गुण), सोहम अजित बोरकर (८५ गुण), संग्राम दिलीप काळे (८३ गुण), परिणीता संतोष हगवणे (७४ गुण), ओम रामेश्वर बोरकर (७३ गुण) आणि स्नेहल दत्तात्रय कुंभारकर (७२ गुण) याप्रमाणे. वनपुरी येथील श्री भैरवनाथ विद्यालय विविध उपक्रमांच्या माध्यमातून नेहमीच तालुका आणि जिल्हा स्तरावर नावलौकिक प्राप्त ठरले आहे. या विद्यालयाची इयत्ता दहावीचा दरवर्षी १०० टक्के निकालाची परंपरा अनेकवर्षे टिकून ठेवली आहे. त्याचबरोबर कबड्डी, खो खो, फुटबॉल अशा क्रीडा प्रकारात तालुका आणि जिल्हा स्तरावर कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे वर्षानुवर्षे कोरले आहे

वद्यालयामध्ये स्पर्धा परीक्षासोबत विविध उपक्रमामध्ये देखील उल्लेखनीय यश संपादन केले आहे. भंडारा जिल्ह्यामध्ये नुकतेच राज्यस्तरीय इन्स्पायर अवॉर्ड चे विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. यामध्ये इयत्ता ७ वीच्या श्रेयश निलेश कुंभारकर या विद्यार्थ्यांचा प्रकल्प राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये विशेष कौतुकास्पद ठरला. तसेच सेवा सहयोग फाउंडेशन पुणे आणि विज्ञानवाहिनी मार्फत वर्षभर विविध उपक्रम विद्यार्थ्यांसाठी राबवले जातात. यामध्ये सेवा सहयोग संस्थेच्या वतीने पिंपरी चिंचवड येथील विज्ञाईन केंद्राला सहलीच्या माध्यमातून भेट दिली आहे.

विज्ञान प्रदर्शनातही या विद्यालयातील इयत्ता आठवीतील संग्राम दिलीप काळे आणि अथर्व शांताराम कुंभारकर या विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात दुसरा क्रमांक प्राप्त करून शाळेचा आणि गावाचा नावलौकिक वाढवला आहे. विद्यालयाच्या उल्लेखनीय यशाबद्दल पुरंदर शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सतीश उरसळ, शाळा समितीचे अध्यक्ष मच्छिंद्रशेठ कुंभारकर, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका लता बोकड यांनी यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. यावेळी वैशाली यादव, अनिता खेसे, दत्तात्रय रोकडे, सुरेश गोरे, जनार्दन कांबळे, राजू खेडकर आदी शिक्षक उपस्थित होते.

---

# आळंदीत 'राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा' कार्यशाळेला वारकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**आळंदी :** शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्या मार्गदर्शनाखाली 'राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा प्रशिक्षण' या उपक्रमांतर्गत राज्यातील प्रेरणादायी कीर्तनकार व वक्त्यांची कार्यशाळा आळंदी येथे आज उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. आत्मसंरक्षणाबरोबरच चारित्र्यनिर्मितीचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाला वारकरी संप्रदायाकडून उत्स्फूर्त पाठिंबा मिळाला. कार्यशाळेत उपस्थित वारकऱ्यांनी शालेय शिक्षण विभागाच्या या उपक्रमास पुढे नेण्यासाठी जबाबदारी स्वीकारत असल्याचे जाहीर केले.

अखिल वारकरी गुरुकुल संघ तसेच राज्यातील विविध वारकरी शिक्षण संस्थांचे अध्यापक आणि कीर्तनकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'संस्कार आणि सुरक्षा' यांची सांगड घालत विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याची गरज यावेळी व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमात 'राष्ट्रनिर्मितीची संस्कारमूल्ये' या अभ्यासक्रम पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. प्रकाशनानंतर उपस्थितांना पुस्तिकेच्या प्रतींचे वाटप करण्यात आले.

विविध वारकरी शिक्षण संस्थांच्या प्रमुखांनी संत साहित्याचा अभ्यासक्रमात समावेश, अध्यापनातील पद्धतशीरता, विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्यांची जडणघडण आणि आत्मसंरक्षणासोबत चारित्र्य संवर्धनाचे महत्त्व




अधोरेखित केले.कार्यक्रमाचे संयोजन वारकरी संप्रदाय युवा मंचचे अध्यक्ष अक्षय भोसले यांनी केले. सूत्रसंचालन उमेश बागडे यांनी तर आभार प्रदर्शन किशोर धुमाळ यांनी केले. वारकरी परंपरेतील मूल्याधिष्ठित शिक्षणाच्या माध्यमातून राज्यातील विद्यार्थ्यांना सशक्त व संस्कारक्षम घडविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

---

# शंभर वर्षांच्या वारकरी परंपरेचा साक्षीदार नीरा नदीवरील पूल वादाच्या भोवऱ्यात

## पाडकामास स्थानिकांचा तीव्र विरोध

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**पुरंदर :** संत साहित्याच्या परंपरेशी जोडलेला आणि शेकडो वर्षांच्या वारकरी भावनेचा साक्षीदार असलेला संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गावरील नीरा नदीवरील इंग्रजकालीन पूल पाडण्याच्या जिल्हाधिकारी आदेशामुळे संपूर्ण पंचक्रोशीत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. ''हा पूल आमच्या भावनांचा आहे; तो पाडू नका,'' अशा शब्दांत नीरा व पाडेगाव ग्रामस्थांनी प्रशासनाच्या निर्णयाला जोरदार विरोध दर्शविला आहे. नीरा नदी (ता. पुरंदर) वरील हा ऐतिहासिक पूल शंभर वर्षांहून अधिक काळ संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखी सोहळ्याचा साक्षीदार राहिला आहे. वारकऱ्यांच्या 'ज्ञानोबा–तुकाराम'च्या गजरात पवित्र झालेला हा पूल केवळ गडांचा नाही, तर श्रद्धा, परंपरा आणि स्थानिक अस्मितेचा जिवंत वारसा असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.



**ग्रामसभेत तीव्र भावना**

बुधवारी (दि.२५) नीरा ग्रामपंचायत कार्यालयात तातडीची बैठक घेण्यात आली. बैठकीत सरपंच तेजश्री काकडे, उपसरपंच राजेश काकडे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रशासनाने पूल पाडण्याऐवजी तो वाहतुकीस बंद करून जतन करावा आणि पालखी सोहळा शेजारील नव्या पुलावरून न्यावा, असा एकमुखी पर्याय ग्रामस्थांनी सुचविला. वारकऱ्यांच्या भक्तिभावाने पावन झालेला हा पूल आमच्या परंपरेचा अविभाज्य भाग आहे. इतिहास पुसू नका; सुरक्षिततेसह

> अनेक साधू संत मंहन्त यांच्या पवित्र स्पर्शने आणि जगतगुरू संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पदस्पर्शने पुनीत झालेले हा पवित्र स्नान तीर्थ स्थान आजही धार्मिक आणि आध्यत्मिक संस्कृतीला जोडणारा हा पूल शासनाने न पाडता या पुलाला राष्ट्रीय सांस्कृतिक स्थळ म्हणून जतन करावे आणि संपूर्ण वारकऱ्यांना कृतज्ञ करावे असे मत सामाजिक कार्यकर्ते सचिनभाऊ मोरे, महेश जेधे पत्रकार राहुल शिंदे, विठ्ठल झांबरे, आणि ग्रामस्थांनी व्यक्त केले आहे.

वारसा जपा, असे आवाहन उपसरपंच राजेश काकडे यांनी केले.

**संवर्धनाचा पर्याय स्वीकारावा :**

ग्रामस्थांनी दाखला देताना सांगितले की, शेजारील सव्वाशे वर्षांपूर्वीचा रेल्वे पूल दुरुस्त करून जतन करण्यात आला आहे. त्याच धर्तीवर या पुलाची दुरुस्ती करून तो वारसा स्थळ म्हणून संरक्षित करावा. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर पूलाची देखभाल केली जात असल्याचे सामाजिक कार्यकर्ते टी. के. जगताप यांनी स्पष्ट केले. पुढील भूमिका व्यक्त करीत विभागीय आयुक्त व पालकमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेऊन निवेदन देण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला आहे. बैठकीत उपस्थित नागरिकांनी हात वर करून या भूमिकेला पाठिंबा दर्शविला. नीरा नदीवरील हा ऐतिहासिक पूल जतन केला जाणार की पाडला जाणार, याकडे संपूर्ण पंचक्रोशीचे लक्ष लागले आहे. प्रशासन सुरक्षिततेचा विचार करताना सांस्कृतिक आणि धार्मिक वारसा जपण्याची भूमिका घेते का, हे पाहणे हत्त्वाचे ठरणार आहे.असून या निर्णया विरोधात सरकारने विचार करावा अन्यथा वारकरी स्टाईल ने शेकडो मृदूंग टाळचा अखंड गजर वारकरी ग्रामस्थांन सह या पुलावर गर्जत राहील असा इशाराही देण्यात आला आहे

---

# पुणे जिल्हा परिषदला सीएसआर फंडातून रुग्णवाहिकेचे हस्तांतरण

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**नाझरे सुपे :** मार्व्हेल इंडिया कंपनी बेंगळुरू यांच्या सहकार्याने त्यांच्या सीएसआर फंडातून पुणे जिल्ह्यातील पानशेत प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी अत्याधुनिक बेसिक सपोर्ट रुग्णवाहिका प्रदान केली आहे. ही रुग्णवाहिका पानशेतच्या डोंगराळ व दुर्गम भागांमध्ये तातडीची वैद्यकीय सेवा घरपोच उपलब्ध करून देणार आहे. या रुग्णवाहिकेचा हस्तांतरणाचा समारंभ जिल्हा परिषद पुणे येथे पार पडला मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.गजानन पाटील यांनी ऑनलाइन माध्यमातून उपस्थित राहून अशा सार्वजनिक खाजगी भागीदारीचे ग्रामीण आरोग्य व्यवस्थेला बळकटी देण्यासाठी असलेले महत्त्व सांगितले ही रुग्णवाहिका पानशेतच्या भौगोलिक परिस्थितीत राहणाऱ्या सर्व गरजू नागरिकांसाठी आरोग्यसेवेतील दरी कमी करण्यास महत्वाची भूमिका बजावेल असे त्यांनी सांगितले.

मार्व्हेल इंडिया कंपनीचे प्रतिनिधींनी रुग्णवाहिकेची किल्ली जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.चंद्रकांत वाघमारे यांच्याकडे दिली. या कार्यक्रमास जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.रामचंद्र हंकारे, डॉ.मृदुला होळकर आणि डॉ.अंबादास देवकर उपस्थित होते.

आवश्यक वैद्यकीय सुविधांनी सुसज्ज असलेली ही रुग्णवाहिका पानशेतच्या दुर्लक्षित भागातील नागरिकांसाठी जीवनदायिनी ठरणार आहे.हा उपक्रम जिल्हा परिषद पुणे यांच्या ग्रामीण विकास, महिला कल्याण आणि डिजिटल आरोग्य परिवर्तनाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांशी सुसंगत आहे.



मार्व्हेल इंडिया कंपनीच्या प्रतिनिधींकडून रुग्णवाहिकेची किल्ली स्वीकारताना जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे व मान्यवर

## द•ख•ल

### घुगलवडगाव जि.प. शाळेत पालक मेळावा; माजी विद्यार्थी संघाची स्थापना

**लिंपणगाव** : श्रीगोंदा तालुक्यातील घुगलवडगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे पालक मेळावा उत्साहात पार पडला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी दीपक दांगडे यांची निवड करण्यात आली. मुख्याध्यापक मगर सर यांनी त्यांचे नाव सुचविले, तर भरत पवार यांनी अनुमोदन दिले.

शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी माजी विद्यार्थी संघ स्थापन करण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. त्यानुसार संघाच्या अध्यक्षपदी रोहीदास दांगडे, तर उपाध्यक्षपदी महेश पवार यांची बिनविरोध निवड झाली. तसेच विविध सदस्यांचीही एकमताने निवड करण्यात आली.

कार्यक्रमास शालेय समितीचे पदाधिकारी, ग्रामस्थ व माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाळेच्या शैक्षणिक व भौतिक प्रगतीसाठी माजी विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग राहील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

### संत शेख महंमदांच्या समाधीस्थळी आज यात्रा महोत्सव



**श्रीगोंदा** : शहराचे आराध्य ग्रामदैवत, वारकरी संप्रदायातील संतकवी संत शेख महंमद यांच्या समाधीस्थळी उद्या शुक्रवारी आमलकी एकादशी निमित्त भव्य यात्रा महोत्सव रंगणार आहे. ग्रामस्थांनी यात्रेसाठी जय्यत तयारी सुरू केली असून शहरात भक्तीमय वातावरण दाटून आले आहे.

संत शेख महंमद हे संत परंपरेतील तेजस्वी व्यक्तिमत्त्व मानले जाते. ते संत तुकाराम यांचे समकालीन होते. हिंदुमुस्लिम ऐक्य व धार्मिक सद्भावनेचे प्रतीक म्हणून त्यांच्या कार्याकडे आजही आदराने पाहिले जाते. महाराष्ट्रात त्यांना कबीरांचा अवतार म्हणूनही ओळखले जाते. ऐतिहासिक नोंदीनुसार मालोजीराजे भोसले यांनी त्यांना गुरू मानले होते, तर समर्थ रामदास यांनी त्यांच्या गौरवासाठी आरती रचली आहे. 'योगसंग्राम', 'पवनविजय' आणि 'निष्कलंकप्रबोध' या त्यांच्या प्रमुख रचना आजही अभ्यासकांसाठी प्रेरणास्थान आहेत.यात्रेचा लाभ सर्वांनी घ्यावा, असे आवाहन ग्रामस्थांकडून करण्यात आले आहे. भक्ती, परंपरा आणि ऐक्याचा हा उत्सव श्रीगोंद्यात पुन्हा एकदा इतिहासाची शुक्रवारी साक्ष देणार आहे.

सप्ताह आमलकी एकादशीच्या सात दिवस आधी समाधी परिसरात ग्रामस्थांतर्फे सात दिवसीय अखंड हरिनाम सप्ताह आयोजित केला जातो. सर्व जाती-धर्म-पंथातील भाविक मोठ्या संख्येने यात सहभागी होतात. भजन, कीर्तन, प्रवचन आणि वारकरी परंपरेतील सामुदायिक उपक्रमांमुळे परिसर भक्तिरसाने न्हाऊन निघतो.

### श्रीरामपुरात ११ गायी, ९ वासरांची सुटका

**श्रीरामपूर** : शहरातील वॉर्ड न. २ मधील नवी दिल्ली, येथील जाफर शकुर कुरेशी यांचे पत्र्याचे शेष्ट/गोठ्यामध्ये चारापाण्याची व्यवस्था न कत्तल करण्याच्या उद्देशाने बांधून ठेवलेल्या ११ गायी, ९ वासरे असे ७ लाख ५० हजाराचे गोवंश जनावरांची सुटका पोलिसांनी केली. पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांना याबाबत माहिती मिळाली होती. त्यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक शिखरे, पोलीस उपनिरीक्षक हंडाळ, पोलीस कॉन्स्टेबल शिवाजी बडे, पोलीस कॉन्स्टेबलअमोल पडोळे, पोलीस कॉन्स्टेबल अजित पठारे या पथकास शहरातील शहरातील वॉर्ड न. २ मधील नवी दिल्ली, येथील जाफर शकुर कुरेशी यांचे पत्र्याचे शेड मध्ये जाऊन पहिले असता तेथे ११ गोवंशीय गायी, ९ वासरे अशा ७ लाख ५० हजाराचे गोवंश जनावरे आढळली. या शेडचा मालक जाफर शकुर कुरेशी हा आंधाराचा फायदा घेवुन गल्ली बोळातुन पळून गेला.

याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात पोलीस कॉन्स्टेबल अमोल बाबुराव गायकवाड यांनी फिर्याद दाखल केली असून पोलिसांनी जाफर शकुर कुरेशी यांचे विरुध्द महाराष्ट्र पाणी संरक्षण अधिनियम १९९५ चे सुधारित कायदा सन २०१५ चे कलम ५.५(ब),९ सह प्राण्यांना कुरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम १९६० चे कलम ११ (च) ११ (ज) (झ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर' ७ मार्चपासून

**कर्जत** : महसूल विभागाच्या सेवा तळागाळातील नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी कर्जत तालुक्यात ७ मार्च ते १५ मे दरम्यान मंडळनिहाय 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर' आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती प्रांताधिकारी नितीन पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी तहसीलदार रवी सतवन उपस्थित होते.

महाराष्ट्र शासनच्या महसूल व वन विभागाच्या १८ फेब्रुवारी २०२६ च्या शासन निर्णयानुसार हे अभियान राबविण्यात येत असून डॉ. पंकज आशिया यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम होणार आहे. अकृषिक रूपांतरण प्रक्रियेतील सुलभीकरण, सनद प्रणाली रद्द, एकवेळ अधिमूल्य तरतूद, तुकडेबंदी कायद्यातील सुधारणा व अभिलेख अद्ययावत करण्यासंदर्भातील 'ई-सुधारणा' याबाबत जनजागृती करण्यात येणार आहे.या शिबिरांत विविध शासकीय योजनांचे अर्ज स्वीकारून लाभांचे वितरण करण्यात येणार आहे.

## लेहनेवाडी ते जामखेड शिवरस्त्याला मिळाला ग्रामीण दर्जा

# शेतीमालाच्या दळणवळणाचा प्रश्न मिटला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड** : जामखेड तालुक्यातील रा. म. मा. ५४८ ते जामखेड ते लेहनेवाडी या तीन किमी अंतराच्या रस्त्याला आता ग्रामीण रस्त्याचा दर्जा मिळाला आहे. राज्य शासनाने याबाबतचा शासन निर्णय जारी केला आहे. विधान परिषदेचे सभापती प्रा. ना. राम शिंदे यांच्या प्रयत्नातून हे मोठे काम मार्गी लागले आहे. या रस्त्यामुळे दळणवळण वाढणार असून शेतकऱ्यांना आपला शेतीमाल कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये नेने आता सोईस्कर होणार आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सभापती प्रा. ना राम शिंदे यांचे अभिनंदन होत आहे.

लेहनेवाडी ते जामखेड हा रस्ता रस्ते विकास योजनेत समाविष्ट करण्यात आला आहे. त्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे ना हरकत पत्र देखील प्राप्त झाले होते. सभापती प्रा. ना. राम शिंदे यांनी यासाठी शासन स्तरावर प्रयत्न केले. सभापती प्रा.ना. राम शिंदे यांच्या प्रयत्नामुळे रस्ते विकास योजनेत या रस्त्याचा समावेश करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. आता हा रस्ता विकसित करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या रस्त्यापासून जवळच कृषी



> लेहनेवाडी ते जामखेड रस्त्यालगत कृषी उत्पन्न बाजार समितीची पंधरा एकर जागा आहे त्या ठिकाणी कांदा मार्केट उभारण्यात येणार आहे. या रस्त्यामुळे कांदा मार्केटला कांदा आणणे शेतकऱ्यांना सोपे होणार आहे. हा एक प्रकारे जामखेड शहराच्या बाहेरून मिनी बायपास होणार आहे. विधान परिषदेचे सभापती प्रा. ना. राम शिंदे यांच्या प्रयत्नामुळे या रस्त्याचे काम मार्गी लागले आहे.
>
> **– शरद कार्ले, सभापती,**
> कृषी उत्पन्न बाजार समिती, जामखेड

उत्पन्न बाजार समितीचे १५ एकर क्षेत्र आहे.या ठिकाणी कांदा मार्केट उभारण्यात येणार आहे. त्यामुळे या रस्त्याचा उपयोग शेतकऱ्यांना शेतीमाल आणि कांदा कृषी उत्पन्न बाजार समितीत आणण्यासाठी सोयीस्कर होणार आहे. तसेच शेतकऱ्यांच्या शेतीमालाच्या दळणवळणाचा प्रश्न मिटणार असून शेतकऱ्यांचा वेळ आणि पैसा वाचणार आहे.

## महाराजा कॉलेजची श्रुतिका पवार ठरली

# 'महिला शिरूर केसरी २०२६'ची मानकरी

**लिंपणगाव** : कोरेगाव येथे दिनांक २० ते २२ फेब्रुवारी दरम्यान पार पडलेल्या शिरूर केसरी २०२६ कुस्ती स्पर्धेत महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय (कर्मयोगी कुस्ती संकुल, पारगाव) व चिंचणी गावची पैलवान श्रुतिका पवार हिने महिला गटातील खुल्या (ओपन) स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत 'महिला शिरूर केसरी'चा किताब पटकावला.

श्रुतिकाने स्पर्धेदरम्यान चारही कुस्त्यांमध्ये दमदार आणि प्रेक्षणीय खेळ सादर करत प्रतिस्पर्ध्यांवर मात केली. तिच्या या यशाबद्दल तिला इलेक्ट्रिक स्कुटी, चांदीची गदा आणि १५ हजार रुपये रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

या यशाबद्दल महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन तथा माजी आमदार बबनराव पाचपुते, समिती सदस्य बाबासाहेब भोस, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी आमदार राहुल जगताप, महावीर पटवा, प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे, पर्यवेक्षक रत्नकर झिटे, उपप्राचार्य डॉ. सुदाम भुजबळ, डॉ. नितीन थोरात, जिमखाना प्रमुख प्रा. रमेश थोरात, क्रीडा समितीचे चेअरमन प्रा. श्रीकांत थोरात, विभागप्रमुख प्रा. रमेश भुजबळ, प्रा. उषा बोरुडे, कार्यालय प्रमुख राऊत सर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तिचे अभिनंदन केले.

श्रुतिकाला कोच रवी बोत्रे, वडील भरत पवार, क्रीडा शिक्षक संजय डफळ



व क्रीडा संचालिका कल्पना बागुल यांचे मार्गदर्शन लाभले. तिच्या या यशामुळे महाविद्यालय व परिसरात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## पोलिसांच्या अपमानास्पद वर्तनाविरोधात

# वकील संघाचा निषेध

## न्यायालयीन कामकाजावर बहिष्कार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव** : येथील दिवाणी व फौजदारी न्यायालय परिसरात घडलेल्या प्रकाराच्या निषेधार्थ शेवगाव वकील संघाने न्यायालयीन कामकाजावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता संघाचे अध्यक्ष ॲड. आर. आर. आगळे यांच्या अध्यक्षतेखाली तातडीची बैठक घेण्यात आली. बैठकीत संबंधित घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला.

दि. २२ फेब्रुवारी रोजी गुन्हा रजिस्टर क्र. १०२/२०२६ अंतर्गत ॲड. आकाश धोंडीराम लव्हाट यांना न्यायालयात हजर करण्यासाठी पोलिसांकडून बेड्या घालून तसेच दोऱ्याने हात बांधून शेवगाव पोलीस स्टेशनपासून न्यायालयापर्यंत पायी आणण्यात आले.

या घटनेमुळे संबंधित वकिलांची मानहानी झाली असून हा प्रकार अपमानास्पद असल्याचे मत बैठकीत उपस्थित वकिलांनी व्यक्त केले.

वकील संघाच्या मते, कायद्याचे जाणकार असलेल्या व्यक्तीला अशा प्रकारे सार्वजनिकरीत्या वागणूक देणे हे गंभीर स्वरूपाचे असून यामुळे वकिलांच्या सन्मानाला धक्का पोहोचला आहे. संबंधित पोलिस कर्मचाऱ्यांवर तात्काळ चौकशी करून योग्य ती शिस्तभंगाची कारवाई करावी, अशी मागणी संघाने केली आहे.

या घटनेच्या निषेधार्थ एकमताने न्यायालयीन कामकाजावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेण्यात आला असून,



तो पुढील आदेशापर्यंत कायम राहील, अशी माहिती संघाच्या पदाधिकाऱ्यांनी दिली. या निर्णयामुळे दिवाणी व फौजदारी न्यायालयातील कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता आहे. दरम्यान, पैठण, संभाजीनगर तसेच जामखेड वकील संघाच्या वतीनेही या घटनेचा निषेध नोंदविण्यात आला आहे. संबंधित निवेदनाच्या प्रती जिल्हा सत्र न्यायालयाकडे पाठवण्यात आल्या असून न्यायालयीन यंत्रणेकडून या प्रकरणी काय भूमिका घेतली जाते, याकडे लक्ष लागले आहे.

## देवाचे नामस्मरण करा देवच या भव पाशातून वाचवेल : डॉ. नारायण महाराज

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर** : श्री संत तुकाराम महाराज बिजोत्सवा निमित्त पारनेर तालुक्यातील वडझिरे येथील अखंड हरीनाम साप्ताहास ५० वर्ष पूर्ण झाल्यामुळे, सुवर्ण महोत्सवी अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.भव्य कीर्तन सोहळ्यातील तिसऱ्या दिवसाचे कीर्तनपुष्प हभप डॉ. नारायणमहाराज जाधव आळंदी यांनी गुंफले.

यावेळी हभप डॉ. नारायणमहाराज जाधव यांनी आलिया भोगासी असावे सादर, देवावरी



भार घालुनिया या संत तुकाराम महाराज यांच्या अभंगावर सविस्तर निरूपण केलें.

यावेळी बोलताना महाराज म्हणाले,जो भोग आपल्याला पूर्व कर्मा मुळे आलेला आहें त्याचा आदर माणसाला करावाचं लागेल.दुःखाचे निवारण व्हावे म्हणून हा सगळा भार देवावर घालवा.देव आपले रक्षण करत असतो.भगवंताला शरण जा,परमात्मा कर्मानुसार फळं देईल.आयुष्यात चांगले वाईट प्रसंग येतं असतात. त्यांना घाबरून न जाता शांतपणे त्याचा स्वीकार करा. आणि त्याचा भार देवावर टाका आणि निश्चिन्त व्हां.आपण कर्ता नाही कर्ता करविता देव आहें याचं भान ठेवा. आपण मनोभावे देवाला शरण जातो तेव्हा तेव्हा देवच आपल्या संकटांचे निवारण करतो. संकटाना घाबरून जाऊ नका. भगवंताचे नाते केलें तरच भगवंत आपल्याला भेटायला येतो.

# राहाता शहरात उपजिल्हा रुग्णालय व्हावे : डॉ. पिपाडा



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : राहाता शहर व परिसरातील वाढती लोकसंख्या, ग्रामीण भागातील रुग्णांची वाढती गरज आणि तातडीच्या आरोग्यसेवेचा अभाव लक्षात घेता राहाता येथील ग्रामीण रुग्णालयाचे दर्जोन्नती करून तेथे अत्याधुनिक उपजिल्हा रुग्णालय स्थापन करण्यात यावे, अशी ठाम मागणी भाजपाचे नेते डॉ. राजेंद्र पिपाडा यांनी राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांची मुंबई येथे भेट घेवुन निवेदनाद्वारे केली आहे.

जिल्ह्यातील पाथर्डी, कर्जत, जामखेड, श्रीरामपुर, पारनेर, श्रीगोंदा, कोपरगाव, अकोले, संगमनेर,राजुर इत्यादी तालुक्यात उपजिल्हा रुग्णालये मंजुर झालेली आहे. असे असताना राहाता तालुक्यातच उपजिल्हा रुग्णालय होत नाही असा प्रश्नही डॉ.राजेंद्र पिपाडा यांनी मंत्र्यांना विचारला. डॉ. पिपाडा यांनी नमूद केले की, राहाता तालुका शिर्डी आंतरराष्ट्रीय धार्मिक पर्यटन क्षेत्राशी निगडित असल्यामुळे येथे दररोज मोठ्या प्रमाणावर भाविक व नागरिकांची ये-जा असते. अपघात, आपत्कालीन उपचार, प्रसूती सेवा व विशेष उपचारांसाठी नागरिकांना अहिल्यानगर किंवा इतर ठिकाणी जावे लागते. त्यामुळे स्थानिक पातळीवर सक्षम उपजिल्हा रुग्णालयाची तातडीची गरज आहे.

# गटविकास अधिकारी आपल्या दारी

## उपक्रमांतर्गत मुंगी येथे घरकुल कामांना गती

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**एरंडगाव** : पंचायत समिती शेवगावच्या कर्तव्यदक्ष गटविकास अधिकारी सोनल शहा यांनी गटविकास अधिकारी आपल्या दारी या उपक्रमांतर्गत मुंगी येथे प्रत्यक्ष भेट देऊन अपूर्ण व सुरू नसलेल्या घरकुल बांधकामांची पाहणी केली. या वेळी पंचायत समितीच्या सर्व विभागांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या एकूण १० पथकांची नियुक्ती करून प्रलंबित कामांना तात्काळ गती देण्याचे निर्देश देण्यात आले.

गावातील सुरू नसलेल्या घरकुल कामांचे भूमिपूजन करून बांधकाम तत्काळ सुरू करण्याबाबत लाभार्थ्यांना सूचना व मार्गदर्शन करण्यात आले. कामे निर्धारित मुदतीत पूर्ण व्हावीत यासाठी आवश्यक तांत्रिक मदत, कागदपत्रांची पूर्तता आणि प्रशासकीय सहकार्य देण्याचे आश्वासनही देण्यात आले.



यावेळी ज्या लाभार्थ्यांनी तत्परतेने घरकुल बांधकाम सुरू केले आहे, अशा लाभार्थ्यांचा गटविकास अधिकारी सोनल शहा यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. या उपक्रमामुळे लाभार्थ्यांमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून गावात विकासकामांना नवी चालना मिळाल्याचे चित्र दिसून येत आहे.

या प्रसंगी पंचायत समितीचे अधिकारी, कर्मचारी, ग्रामपंचायत अधिकारी, सरपंच, सदस्य तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. गटविकास अधिकारी आपल्या दारी या उपक्रमामुळे प्रशासन थेट गावकऱ्यांच्या दारी पोहोचून प्रश्न सोडविण्याचा प्रभावी प्रयत्न करत असल्याची भावना विस्तार अधिकारी सचिन भाकरे यांनी व्यक्त केली.

# नगरमध्ये भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट

## मनपाच्या कुत्रे पकड मोहिमेवर गंभीर प्रश्नचिन्ह
## कुत्रे पकडण्याची जबाबदारी दिलेल्या संस्थेची ५० लाख थकबाकी


**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : शहरात भटक्या कुत्र्यांचा संचार दिवसेंदिवस वाढत असून, त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. शहरातील विविध भागांत दर आठवड्याला दोन ते चार कुत्रे चाव्याच्या घटना घडत असल्याचे चित्र आहे.

लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच दुचाकीस्वार यांना या समस्येचा मोठा फटका बसत आहे. मात्र, या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासन कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यात पूर्णतः अपयशी ठरत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

शहरातील मुख्य रस्ते, चौक, शाळा परिसर, बाजारपेठा आणि रुग्णालय परिसरात मोठ्या संख्येने भटके कुत्रे मुक्तपणे फिरताना दिसतात. काही भागात तर रात्रीच्या वेळी कुत्र्यांचे टोळके रस्त्यावर ठाण मांडून बसलेले असते. त्यामुळे वाहनचालकांना वारंवार अडथळे निर्माण होत असून, अपघातांच्या घटनांमध्येही वाढ झाली आहे. या परिस्थितीमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

गेल्या अनेक महिन्यांपासून शहरातील नागरिक, सामाजिक संस्था आणि विविध संघटनांनी महापालिकेकडे कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी तक्रारी केल्या आहेत. काही ठिकाणी निवेदन देऊन लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, या सर्व बाबींकडे प्रशासनाने



केवळ आश्वासनांपुरतेच समाधान मानल्याचे दिसून येते. प्रत्यक्षात कुत्रे पकडण्याची ठोस आणि परिणामकारक मोहीम शहरात कुठेही राबवली जात नसल्याचा आरोप होत आहे.

दरम्यान, महापालिका प्रशासनाकडून वारंवार असे सांगण्यात येते की कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याचे काम दिलेल्या संस्थेला ५० लाख रुपयांचे देणे बाकी आहे. मात्र, इतक्या मोठ्या रकमेचा उल्लेख होत असताना प्रत्यक्षात शहरात कुत्र्यांची संख्या कमी झालेली दिसत नाही. त्यामुळे नेमके किती कुत्रे पकडण्यात आले? कुठल्या भागातून पकडण्यात आले? ही मोहीम कधी राबवण्यात आली? आणि त्याचा ठोस अहवाल कुठे आहे? असे अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

नागरिकांच्या मते, शहरात कुठेही व्यापक स्वरूपात कुत्रे पकडण्याची मोहीम राबवली गेल्याचे चित्र दिसून आलेले नाही. जर प्रत्यक्ष काम झाले असेल, तर त्याचा तपशील महापालिकेने जाहीर करावा, अशी जोरदार मागणी होत आहे. पकडलेल्या कुत्र्यांची संख्या, कामाचे दिवस, संबंधित कर्मचाऱ्यांची नावे आणि खर्चाचा तपशील नागरिकांसमोर मांडावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

महापालिकेने याबाबत पारदर्शक भूमिका न घेतल्यास नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास आणखी ढासळण्याची शक्यता आहे. शहरातील नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर असताना केवळ कागदोपत्री आकडेवारी दाखवून परिस्थितीवर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे कुत्रे पकडण्याच्या मोहिमेची स्वतंत्र चौकशी करून सत्य परिस्थिती समोर आणावी, अशी मागणी विविध सामाजिक संघटनांनी लावून धरली आहे.

दैनिक राष्ट्र सह्याद्री
शुक्रवार, दि.२७ फेब्रुवारी २०२६ । अहिल्यानगर । पान नं. ८

# विवाहितेचा विनयभंग; तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

**राहुरी :** तालुक्यातील उंबरे परिसरात २५ वर्षीय विवाहित तरुणीला मारहाण करून विनयभंग केल्याची धक्कादायक घटना २५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी घडली. या प्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित तरुणी सायंकाळी पाच वाजताच्या सुमारास पाण्याचा ड्रम आणण्यासाठी घराबाहेर गेली असता आरोपींनी तिला घरात ओढून मिठी मारत लज्जास्पद वर्तन केले. त्यानंतर पीडित तरुणी व तिच्या पतीने जाब विचारला असता आरोपींनी शिवीगाळ करत दगड व लाथाबुक्क्यांनी मारहाण करून धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणी भारत प्रभाकर वैरागर, शरद प्रभाकर वैरागर व एक महिला (रा. उंबरे, ता. राहुरी) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ७४, ११८(१), ११५(२), ३५१(२), ३५२, ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# श्रीरामपूर पालिकेचा १९२ कोटींचा शिलकी अर्थसंकल्प मंजूर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**श्रीरामपूर :** कोणत्याही प्रकारची करवाढ न करता श्रीरामपूर नगरपालिकेने २०२६-२०२७ या आर्थिक वर्षासाठी ६ लाख ५६ हजार ७९६ रुपयांच्या शिलकेसह एकूण १९२ कोटी ४३ लाख २५ हजार १५६ रुपयांचा शिलकी अर्थसंकल्प सादर केला. यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित विशेष सभेत हा अर्थसंकल्प सर्वानुमते मंजूर करण्यात आला. शहराच्या विकासासाठी विविध योजना आणि तरतुदींचा समावेश असून, नागरिकांच्या हिताला प्राधान्य देण्यात आले आहे.

सभेच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष करण ससाणे होते. उपनगराध्यक्षा कांचनताई सानप, मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांच्यासह पालिकेचे सर्व अधिकारी उपस्थित होते. विशेष म्हणजे, भाजपच्या गटनेत्याशिवाय ही सभा पार पडली. सभेत शहराच्या चारी बाजूंनी भाजी मंडई उभारणे, पाणीपुरवठा दरवाढीला विरोध, शहरालगतच्या ग्रामपंचायती हद्दीतील नागरिकांना मुदतवाढ देऊन पाणीपट्टी वसुली आणि सुरळीत पाणीपुरवठा, तसेच धार्मिक स्थळांच्या घरपट्टी माफी यासारख्या विषयांवर चर्चा झाली. दिलीप नागरे यांनी पाणीपट्टी वाढवण्याचा प्रस्ताव मांडला; मात्र, श्रीनिवास बिहाणी यांनी शहरात नियमित आणि स्वच्छ पाणीपुरवठा होत नसल्याचे सांगून विरोध केला. नगराध्यक्ष ससाणे यांनी भंडारदरा धरणातील पाण्याच्या रोटेशनची शाश्वती नसल्याने पाणीपट्टी वाढवणे शक्य नसल्याचे स्पष्ट केले.

सभेत शहरातील व्यावसायिकांना आकारण्यात येणाऱ्या २७% घरपट्टीवर चर्चा झाली. शिक्षण कर, वृक्ष कर आणि स्वच्छता कर मिळून हा दर ४८% पर्यंत पोहोचतो, असे बिहाणी यांनी निदर्शनास आणले. त्यामुळे थकबाकी वाढली असून, दर २३% पर्यंत कमी केल्यास वसुली सुलभ होईल आणि पालिकेचे उत्पन्न वाढेल, असे मत व्यक्त करण्यात आले.याशिवाय, कचरा संकलनातील थकबाकी, दैनंदिन वसुली ठेका, प्रधानमंत्री आवास योजनेतील ६५२ घरकुलांना शेवटचा हप्ता मिळणे आणि भुयारी गटार योजनेवर चर्चा झाली. शासनाने ही योजना बंद केल्याने पुढील सभेत बंदीचा ठराव घेऊन स्वच्छ भारत अभियानात नवीन प्रस्ताव सादर करण्याची गरज ससाणे यांनी व्यक्त केली. योजनेची शिल्लक रक्कम आणि व्याज बँकेत सुरक्षित असून, ते शासनाला जमा करावे लागेल, असे मुख्याधिकारी घोलप यांनी सांगितले.

सभेत दिलीप नागरे, मुजफ्फर शेख, श्रीनिवास बिहाणी, आशिष धनवटे, संजय गांगड, दीपक चव्हाण, स्नेहल खोरे, मंजुश्री मुरकुटे यांनी सहभाग घेतला. हा अर्थसंकल्प शहराच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरणार असून, नागरिकांना दिलासा देणारा आहे.

### ठळक महसुली आणि भांडवली तरतुदी

महसुली जमा: ७५ कोटी ५१ लाख २० हजार ३०० रुपये
भांडवली जमा: ११६ कोटी ८६ लाख ३२ हजार ७०८ रुपये
महसुली खर्च: ७४ कोटी ९० लाख ६८ हजार ३६० रुपये
(आस्थापना: ३२ कोटी ५२ लाख,
प्रशासकीय: ७ कोटी ५७ लाख, व्यवहार
आणि कार्यक्रम: ११ कोटी ९१ लाख)
भांडवली खर्च: ११७ कोटी ४६ लाख रुपये
शिल्लक: ६ लाख ५६ हजार ७९६ रुपये
------

### विशेष विकास तरतुदी
### हिंदू सम्राट बाळासाहेब ठाकरे

लोककल्याण अभियान : ५० लाख रुपये
नगरपालिका शाळा देखभाल व दुरुस्ती : ५० लाख रुपये
छत्रपती संभाजी महाराज पुतळा
उभारणे व सुशोभीकरण : ५० लाख रुपये
नमो उद्यान (बगिचा): १ कोटी रुपये

श्रीरामपूर पालिका निवडणूक

# ससाणेंचा ५ लाख १४ हजार रुपये खर्च

## चित्ते,बिहानी यांचा साडेसात लाखाहून अधिक

शफीक बागवान । राष्ट्र सह्याद्री




**राज्य निवडणूक आयोगाने यावेळी नगरपालिका नगरपंचायतीत निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची खर्चाची मर्यादा वाढवली होती. श्रीरामपूर नगरपालिका अ वर्ग नगरपरिषद मध्ये मोडत आहे. या पालिकेच्या अध्यक्षपदासाठी १५ लाख तर सदस्यपदासाठी पाच लाख रुपये खर्चाची मर्यादा ठरविण्यात आली होती. मात्र नगराध्यक्षांसह नगरसेवकांनी देखील या निवडणुकीत खर्चासाठी हात आखडता घेतल्याचे आकडेवारीवरून सिद्ध झाले आहे.**

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर नगरपालिका नगराध्यक्ष तसेच नगरसेवक यांच्या निवडणुकीचा खर्चाचा तपशील जाहीर झाला आहे. या निवडणुकीत नगराध्यक्ष पदासाठी शिवसेनेचे प्रकाश चित्ते (एकनाथ शिंदे गट ) यांचा सर्वाधिक ७ लाख ६५ हजार खर्च झाला असून दुसऱ्या क्रमांकावर भाजपाचे श्रीनिवास बिहानी यांचा ७ लाख ५२ हजार इतका खर्च झाला आहे. विद्यमान नगराध्यक्ष करण ससाणे यांचा खर्चामध्ये तिसरा क्रमांक लागला असून त्याचा ५ लाख १४ हजार इतका खर्च झाला आहे.

त्या खालोखाल शिवसेनेचे अशोक थोरे ( उबाठा) यांचा ४ लाख ६० हजार, त्यानंतर जोएब शेख १ लाख १२ हजार, आकाश शेंडे ७ हजार वसंत कोल्हे ६ हजार , निलेश भालेराव ४ हजार तर चरण चव्हाण यांचा २२ हजार इतका खर्च झाला आहे.

या निवडणुकीत प्रभाग वाईज निवडून आलेल्या उमेदवारांचा खर्च पुढील प्रमाणे कंसात असून जागे अभावी तो राऊंड फिगर मध्ये घेण्यात आलेला आहे.

प्रभाग एक - दीपक वमने (५६,०००), सोनिया कक्कड (४०,०००). प्रभाग दोन - प्रणिती चव्हाण (३९,०००), अर्जुन दाभाडे (७०,०००). प्रभाग तीन - पण नागेश्वरी एडके (५३,०००), कांचन सानप (७२,०००). प्रभाग चार - दिलीप नागरे (७७,०००), नवनीत कौर सेठी (१ लाख). प्रभाग पाच - जकीया शेख (३९,०००), मुजफ्फर शेख (५६,०००). प्रभाग सहा - राजेंद्र पवार (७१,६००), शाहेला शाह (१,५२,०००). प्रभाग सात - श्याम अडांगळे (८३,०००), यास्मिन शेख (८२,०००). प्रभाग आठ - जायदा कुरेशी (६३,०००), रईस शेख (८२,०००). प्रभाग नऊ - सिद्धार्थ फंड (७३,०००), निलोफर शेख (७०,०००). प्रभाग दहा - वैशाली पोटे (५४,०००), संदेश गांगड (८३,०००). प्रभाग अकरा - मंजुश्री मुरकुटे (९५,०००), आशिष धनवटे (४०,०००). प्रभाग बारा - आकाश बेग (८४,०००), जयश्री पाटील (३३,०००). प्रभाग तेरा - वैशाली चव्हाण (४५,०००), दीपक चव्हाण (३४,०००). प्रभाग चौदा - ड. संतोष कांबळे (३३,०००), आशा परदेशी (३४,०००). प्रभाग पंधरा - योगिता नागले (६६,०००), योगेश जाधव (४७,०००). प्रभाग सोळा - आशा रासकर ४१,०००), जितेंद्र छाजेड (१ लाख ८ हजार). प्रभाग सतरा - स्नेहल खोरे (९५,०००), मनोज लबडे (१ लाख ११ हजार).

# गुंजाळवाडी सरपंचपदाचे अपील उच्च न्यायालयाने फेटाळले; जिल्हाधिकाऱ्यांना चौकशीचे आदेश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर :** राजकीयदृष्ट्या महत्त्वपूर्ण समजल्या जाणाऱ्या गुंजाळवाडीचे सरपंच अमोल गुंजाळ यांनी औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) उच्च न्यायालयामध्ये दाखल केलेले अपील फेटाळून अहिल्यानगर जिल्हाधिकाऱ्यांना फेरचौकशीचे आदेश दिले आहेत.

संगमनेर शहरालगत सर्वात मोठी ग्रामपंचायत म्हणून गुंजाळवाडी ओळखली जाते. या ग्रामपंचायतीची सार्वत्रिक निवडणूक सन २०२३- २४ मध्ये पार पडली होती, निवडणुकीनंतर अमोल संभाजी गुंजाळ हे जनतेतून सरपंच म्हणून निवडून आले. सरपंच गुंजाळ यांनी गावठाणामध्ये अतिक्रमण केले तसेच नामनिर्देशन अर्ज दाखल करतेवेळी ज्ञानदीप माध्यमिक विद्यालयामध्ये शिपाई या पदावर कर्मचारी असल्याने संस्थेचा व सक्षम अधिकारी यांचे ना हरकत प्रमाणपत्र जोडले नाही अशी तक्रार पंढरीनाथ लक्ष्मण गुंजाळ यांनी अहिल्यानगर जिल्हाधिकारी यांच्याकडे ४/२०२४ नंबरने अपील दाखल केले होते.

जिल्हाधिकाऱ्यांनी सरपंच अमोल गुंजाळ यांच्या बाजूने निर्णय दिला होता आणि तक्रारदार पंढरीनाथ गुंजाळ यांचे अपील फ ेटाळून लावले होते. त्यानंतर तक्रारदार पंढरीनाथ गुंजाळ यांनी नाराज होऊन जिल्हाधिकारी यांच्या निर्णयाच्या विरोधात नाशिक अप्पर विभागीय आयुक्तांकडे अपील नंबर ३८/२०२५ दाखल केले होते. अप्पर विभागीय आयुक्तांनी तक्रारदार पंढरीनाथ गुंजाळ यांचे अपील अंशतः मान्य करून जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेला निर्णय विवाद अर्ज ४/२०२४ २० जानेवारी, २०२५ रोजीचा जिल्हाधिकारी यांनी पारित केलेला आदेश रद्द करण्यात आला आणि या प्रकरणाची फेरचौकशी करण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांना दिले.

त्यावर सरपंच अमोल गुंजाळ यांनी नाराज होऊन नाशिक अप्पर विभागीय आयुक्त यांच्या विरोधात मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात दाद म ागण्यासाठी अपील रिट पिटशन १४४५१/२०२५ या नंबरने अपील दाखल केले होते. या अपीलावर १४ जानेवारी २०२६ रोजी न्यायाधीश एस.जी. चपळगावकर यांच्यासमोर सुनावणी झाली. यावेळी पंढरीनाथ गुंजाळ यांच्यावतीने ड. सुवर्णा झावरे यांनी व सरपंच अमोल गुंजाळ यांच्यावतीने ड. ए. डी. सोनकवडे यांनी जोरदार युक्तिवाद केला. त्यानंतर न्यायाधीश चपळगावकर यांनी नाशिक विभागीय अप्पर आयुक्तांचा निर्णय कायम ठेवत सरपंच अमोल गुंजाळ यांचे अपील फेटाळण्यात आले आणि जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांना फेर चौकशीचे आदेश दिले. परंतु आता जिल्हाधिकारी यांच्या चौकशीत काय बाहेर येते याकडे संपूर्ण गुंजाळवाडी आणि संगमनेर तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# केस मागे घे, नाहीतर संपवू

## चाकूच्या धाकावर बेदम मारहाण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** तालुक्यातील कायदा-सुव्यवस्थेला थेट आव्हान देणारी धक्कादायक घटना समोर आली आहे. दुपारच्या उजेडात दुचाकीवरून घरी जाणाऱ्या तरुणाचे अपहरण करून चाकूच्या धाकावर मारहाण करण्यात आल्याने खळबळ उडाली आहे.

ही घटना दि. २५ फेब्रुवारी रोजी अजनुज चौका जवळ घडली आहे फिर्यादी गौरव बाळासाहेब गिरमकर (वय ३१, रा. अजनुज) हे काष्टीहून घरी जात असताना पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट कारने त्यांचा रस्ता अडवला. कारमधून उतरलेल्या आरोपींनी त्यांना जबरदस्तीने गाडीत ढकलले.फिर्यादीने आरडाओरडा करताच एका आरोपीने गळ्यावर चाकू लावून आवाज केला तर ठार मारू अशी धमकी दिली. त्यानंतर त्यांना केडगाव चौफुला (ता. दौंड) येथील निर्जन ठिकाणी नेण्यात आले.त्यानंतर पाठीवर व पायांवर पीव्हीसी पाईपने मारहाण करत डोक्यावर व तोंडावर दांडक्याचे वार करण्यात आले आहेत तसेचगळा व छातीवर चाकूने वार करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे त्यानंतर त्यास निर्जन स्थळी नेण्यात आले त्यानंतर संध्याकाळी सुमारे ८.४५ वाजता म ंडवगण फराटा (ता. शिरूर) येथील माऊली मंदिर परिसरात जखमी अवस्थेत त्यांना सोडून आरोपी पसार झाले. नातेवाईकांनी तातडीने त्यांना श्रीगोंद्यातील रुग्णालयात दाखल केले असून आयसीयूमध्ये उपचार सुरू आहेत.या प्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गु.र.नं. १७९/२०२५ अन्वये बीएनएसच्या विविध गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल झाला आहे. आरोपींमध्ये पंकज शेलार, राजेंद्र शेलार, उमेश परभणे व इतर दोघांचा समावेश आहे. मात्र अद्याप कोणालाही अटक झालेली नाही. दिवसाढवळ्या अपहरण, जीवघेणा हल्ला आणि न्यायालयीन प्रकरण मागे घेण्यासाठी धमकी हे प्रकरण गंभीर असून पोलिसांनी तात्काळ पाऊले उचलण्याची गरज निर्माण झाली आहे

श्रीगोंद्यातील जनतेला पडलेला प्रश्न ?

याबाबत कारवाई कधी होणार कायदा कागदावर नाही, मैदानात दिसायला हवा. आता सगळ्यांच्या नजरा पोलिसांच्या पुढच्या पावलावर आहेत.

# जमीन अपहार प्रकरणात मूळ नोंदी कायम...

## न्यायालयाचे छल्लाणी व दुधेडिया यांच्यावर गुन्हा दाखल करण्याचे आदेश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**श्रीरामपूर :** नानासाहेब गलांडे पाटील जमीन नोंद प्रकरणात अखेर सत्य समोर आले. ३० जानेवारी २०२६ रोजी भूमीलेख उपसंचालक नाशिक यांनी अपीलवरील अंतिम निर्णय दिला. त्यानुसार उंदीरगाव येथील गट क्रमांक ७९ संदर्भातील वादग्रस्त फेरफार कायदेशीरदृष्ट्या अमान्य ठरवला आहे. याप्रकरणी मूळ नोंदी कायम ठेवण्याचे निर्देश न्यायालयाकडून देण्यात आल्याने नानासाहेब काशिनाथ गलांडे यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

दरम्यान, फसवणूक व बनावट कागदपत्रांच्या आरोपांप्रकरणी प्रवीणकुमार उत्तमचंद छल्लानी व राजेंद्रकुमार दुधेडिया यांच्याविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम ४२०, ४६८, ४७१ सह ३४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्याचे आदेश श्रीरामपूर न्यायालय येथील प्रथम श्रेणी न्यायाधीश जितेंद्र डी. जाधव यांनी २५ फेब्रुवारी रोजी दिले. उपअधीक्षक, भूमिअभिलेख यांच्याविरुद्धची तक्रार मात्र फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ कलम १९७ अंतर्गत मंजुरीअभावी नाकारण्यात आली. न्यायालयीन आदेशानुसार झालेल्या पोलीस तपासात जबरदस्तीने नोंद लावल्याची बाब समोर आल्याची माहिती सूत्रांनी दिली. या प्रकरणाचे कामकाज अ‍ॅड. बापूसाहेब इंगळे, अ‍ॅड. अरुण लबडे व अ‍ॅड. यशवंत उंडे यांनी पाहिले.

# जुन्या अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे निवृत्तीचे वय ६५ वर्षे!

## थकीत देयके मिळणार : मंत्री अदिती तटकरे यांच्या समवेत बैठकीत निर्णय



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी कृती समितीच्या प्रतिनिधींनी महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत मंत्रालयात घेतलेल्या बैठकीत अंगणवाडी सेविका व मदतनीसांच्या विविध म ागण्यांवर सविस्तर चर्चा झाली. या बैठकीत जुन्या कर्मचाऱ्यांचे निवृत्तीचे वय ६५ वर्षे करण्यासह थकीत देयकांच्या अदा करण्यास मंजुरी मिळाली; मात्र उन्हाळी सुट्टी वाढवणे आणि लाडकी बहीण अर्ज भरण्याच्या मोबदल्यासारख्या मुद्द्यांवर तोडगा निघू शकला नाही.

बैठकीला कृती समितीचे जीवन सुरुडे, शुभा शमीम, राजेश सिंग, दत्ता देशमुख आणि शकुंतला घोरपडे उपस्थित होते. मंत्री तटकरे, प्रधान सचिव, उपसचिव आणि आयसीडीएस आयुक्त यांच्यासोबत झालेल्या चर्चेत अंगणवाडी कर्मचाऱ्यांना मासिक पेन्शन, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ग्रॅच्युटी, प्रोत्साहन भत्ता मानधनात समाविष्ट करणे, मिनी सेविका व मदतनीसांच्या थेट सेविका पदावर नियुक्ती, आजारपणाची रजा, उन्हाळी एक महिन्याची सुट्टी, थकीत केंद्रीय मानधन, फाईव्ह जी टॅब, डेटा रिचार्ज, थकीत टीए-डीए, इंधन, सीबीई भत्ता आदी मुद्द्यांवर विचारविनिमय झाला.

कृती समितीचे जीवन सुरुडे यांनी सांगितले की, बैठकीत अनेक मुद्द्यांवर सकारात्मक चर्चा झाली. जुन्या कर्मचाऱ्यांचे निवृत्ती वय ६५ वर्षे करण्यास आणि सर्व थकीत देयके अदा करण्यास मान्यता मिळाली. प्रोत्साहन भत्त्याच्या निकषात बदल आवश्यक असल्याचे मान्य करून १५ दिवसांत सूचना पाठवण्याचे निर्देश देण्यात आले. तथापि, उन्हाळी सुट्टी वाढवणे आणि मदतनीसांना लाडकी बहीण अर्ज भरण्याचा मोबदला देण्याबाबत कोणताही निर्णय झाला नाही.

याशिवाय, अंगणवाडी केंद्रापासून ठराविक अंतरावर खाजगी किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बालवाड्या उघडण्यास परवानगी न देण्याबाबत शालेय शिक्षण विभागाशी चर्चा करण्यास मंजुरी मिळाली. तसेच, निवडणूक कामे न देण्याबाबत निवडणूक आयोगाशी बोलण्याचेही ठरले. या बैठकीमुळे अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या समस्या सोडवण्याच्या दिशेने पाऊल पडले आहे. मात्र, काही प्रमुख मागण्या अद्याप अनुत्तरित राहिल्या असून, कर्मचाऱ्यांमध्ये अपेक्षित समाधान झाले नसल्याचे दिसून येत आहे. राज्यातील हजारो अंगणवाडी कर्मचाऱ्यांना या निर्णयांचा लाभ होणार असून, पुढील प्रगतीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.